# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

March 2022 / Issue No. 2 | Price : Rs. 30/-





उत्तर महाराष्ट्र शाखा नाशिक
50th Year of Empowerment...
North Maharashtra MACCIA
०९ एप्रिल २०२२
सुवर्णमहोत्सवी वर्ष





## उत्तर महाराष्ट्र विकास परिषद

## Maharashtra Skill Summit - 2022

०९ एप्रिल २०२२, महाकवी कालीदास सभागृह, शालिमार, नाशिक. सकाळी १०:०० वा.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर

## उत्तर महाराष्ट्र शाखा नाशिक
## सुवर्णमहोत्सवी वर्ष

# ॥ उद्घाटन समारंभ ॥

०९ एप्रिल २०२२,
महाकवी कालीदास सभागृह, शालिमार, नाशिक.
सकाळी १०:०० वा.

**उद्घाटक**



**महामहिम मान. भगतसिंह कोश्यारी**
राज्यपाल– महाराष्ट्र राज्य

**प्रमुख पाहुणे**




**ना. भारती पवार**
केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री,
भारत सरकार



**ना.श्री. बाळासाहेब थोरात**
महसुल मंत्री,
महाराष्ट्र राज्य



**ना.श्री. छगन भुजबळ**
पालकमंत्री,
नाशिक



**ना.श्री. राजेश टोपे**
आरोग्य मंत्री,
महाराष्ट्र राज्य



**श्री. हेमंत गोडसे**
खासदार,
नाशिक

**निमंत्रक**

**ललित गांधी**
अध्यक्ष

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **तनसुख झांबड**<br>उपाध्यक्ष | **चंद्रशेखर पुनाळेकर**<br>उपाध्यक्ष | **रविंद्र माणगावे**<br>उपाध्यक्ष | **सुधाकर देशमुख**<br>उपाध्यक्ष | **शुभांगी तिरोडकर**<br>उपाध्यक्ष | **करूणाकर शेट्टी**<br>उपाध्यक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **सौ. सुनिता फाल्गुने**<br>चेअरमन - नाशिक शाखा | **संजय सोनवणे**<br>को- चेअरमन - नाशिक शाखा | **विजय वेदमुथा**<br>चेअरमन - सुवर्ण महोत्सव नियोजन समिती | **आशिष पेडणेकर**<br>चेअरमन - ट्रस्ट बोर्ड | **संतोष मंडलेचा**<br>माजी अध्यक्ष |

MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

March 2022 / Issue No. 2

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१

फोन : (०२२) २२८५५८५९६६०

ई-मेलः maccia@maccia.org.in

वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **उमेश दाशरथी**
- उपाध्यक्ष
  **करुणाकर शेट्टी**
  **शुभांगी तिरोडकर**
  **रविंद्र माणगावे**
  **सुधाकर देशमुख**
  **चंद्रशेखर पुनाळेकर**
  **तनसुख झांबड**
- प्रभारी सरकार्यवाह
  **सागर नागरे**
- संपादक
  **विनी दत्ता**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक**
- **शाखा कार्यालय**
- २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक - १. फोनः (०२५३)२५७७७०४ । ई-मेलः nsk@maccia.org.in

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

## अंतरंग

१. संपादकीय

२. महाराष्ट्र चेंबरचे ४० वे अध्यक्ष ललित गांधी यांचा पदग्रहण समारंभ

३. सामान्यांच्या पैशांतुन राष्ट्रीय महामार्ग
- केंद्रीय मंत्री नितिन गडकरी

४. कृषी, पायाभूत सुविधा व स्टार्ट अप क्षेत्रासाठी भरीव तरतुदी स्वागताई
- ललित गांधी

५. Micro Enterprise : Engine Of Economic Growth
- Mr. Gautam E. Thakur

६. किसान/कृषी ड्रोन्स व भारतातील शेतीचे भविष्य
- Dr. Gayatri Phade

७. 'BATATA' Can Replace all Taxes..
- **Vikas V. Deodhar**

८. महिलांनो उद्योगातील BOSS बना!
- **Mrs. Sangita Patil**

९. राज्यातील विमानसेवांचा कालबध्द विकास केला जाईल - दिपक कपूर

१०. औद्योगिक वीज दर अनुदान स्थगितीस महाराष्ट्र चेंबरचा तीव्र विरोध



# संपादकीय..

**ललित गांधी**
अध्यक्ष

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' च्या निवडणूक प्रक्रियेनंतर अस्तित्वात आलेल्या नवीन कार्यकारीणीचा अधिकृत पदग्रहण समारंभ अत्यंत उत्साहात व चैतन्यपुर्ण वातावरणात संपन्न झाला.

राज्या आर्थिक प्रगतीचा पाया रचणाऱ्या, महाराष्ट्राच्या व्यापार, उद्योगाची मजबुत पायाबांधणी करणाऱ्या राज्याच्या शिखर संस्थेचे नेतृत्व करण्याची संधी ही आव्हानात्मक असली तरी आयुष्यातील सर्वात महत्वाची संधी मिळाली आहे.

महाराष्ट्र चेंबर चा ४० वा अध्यक्ष म्हणुन मला पदभार सोपविण्यासाठी विकासपुरूष म्हणुन ओळख निर्माण करणारे देशाचे परिवहन, रस्ते बांधणी खात्याचे मंत्री, ज्येष्ठ नेते व माझे मार्गदर्शक नामदार नितिन गडकरी उपस्थित राहीले यासारखी अभिमानाची बाबच काय?

या कार्यक्रमाला माझे दुसरे स्नेही केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड यांची उपस्थिती म्हणजे दुग्धशर्करा योगच म्हणावा.

अत्यंत महत्वाची अशी ही जबाबदारी स्विकारताना. चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांनी चेंबरची स्थापना व विकास करण्याच्या माध्यमातुन महाराष्ट्राच्या औद्योगिकरणचा पाया रचला, त्यांना तशाच तोलामोलाच्या सहकाऱ्यांची मिळालेली साथ या गोष्टींचे स्मरण प्रकर्षाने होत आहे.

त्यांनी पाहिलेल्या स्वप्नांच्या दिशेने वाटचाल करताना महाराष्ट्र चेंबर शंभरीकडे मार्गक्रमण आहे अशा महत्वाच्या कालखंडात अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना मलाही तसेच सहकारी लाभले आहेत हे माझे अहोभाग्यच आहे.

मॅनेजिंग कमिटी, गव्हर्निंग काउन्सील व एक्सपर्ट समिती सर्वच ठीकाणी अत्यंत समर्पित तोलामोलाचे सहकारी लाभल्याने शतकमहोत्सवाची ही वाटचाल चेंबरला वैभव शिखरापर्यंत नेउन जाईल याची खात्री आहे.


मा. ना. नितिन गडकरी यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा एक रोड मॅप तयार करण्याची जबाबदारी 'महाराष्ट्र चेंबर' ला सोपविली आहे. चेंबरच्या टीमने या विषयी कार्य सुरू केले असुन, महाराष्ट्रात प्रत्येक जिल्हा स्तरावर महाराष्ट्र चेंबर पुरस्कृत जिल्हा डेव्हलपमेंट फोरम ची स्थापना करण्यात येणार आहे. या फोरम मध्ये व्यापार, उद्योग, सेवा, कृषि, शिक्षण, पर्यटन, पर्यावरण, पायाभुत सुविधा अशा विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ति व संस्था यांना सहभागी करून घेऊन प्रत्येक जिल्ह्याचा विकास आराखडा बनविण्याचे नियोजन आहे.

'महाराष्ट्र चेंबर' तर्फे व्यापार, उद्योग, कृषि, पर्यटन, वाहतुक, पर्यावरण, वस्त्रोद्योग, महिला उद्योजकता, एसएमएई, आयटी व तंत्रज्ञान, कौशल्य विकास या क्षेत्रासाठीचे धोरण बनविण्याचे काम सुरू केले असुन महिला उद्यमीता धोरण (२०२२-२७) जाहीर करण्यात आले असुन अन्य विषयांवरील धोरण निश्चितीची प्रक्रिया सुरू आहे.

शतकमहोत्सवाच्या या गौरवपुर्ण वाटचालीचे नियोजन सुरू असतानाच आनंददायी बाब म्हणजे चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभाग शाखेचे 'सुवर्ण महोत्सवी वर्षात' पदार्पण... यानिमित्त ०९ एप्रिल २०२२ रोजी नाशिक येथे सुवर्ण महोत्सव वर्ष प्रारंभ, उत्तर महाराष्ट्र विकास परिषद व महाराष्ट्र राज्य स्कील समिट अशा भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असुन आपण उपस्थित राहुन हा आनंद द्विगुणित करावा.

# व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी वाहतुकीचा खर्च कमी करा; निर्यात वाढवा - केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी

## महाराष्ट्र चेंबरचे ४० वे अध्यक्ष ललित गांधी यांचा पदग्रहण समारंभ संपन्न





समारंभास मार्गदर्शन करताना केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी. दुसऱ्या छायाचित्रात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते अध्यक्षीय ट्रॉफी देऊन नूतन अध्यक्ष ललित गांधी यांना पदभार देण्यात आला सोबत केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड, आमदार प्रकाश आवाडे.

**मुंबई** : जगात भारत व देशात महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सर्वात अधिक गतीने वाढत आहे. निर्यात वाढवून आयात कमी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी व व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी वाहतुकीसाठी होणारा खर्च कमी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र चेंबरने राज्याच्या विकासासाठी म हत्वाचे योगदान दिले आहे. येणारा काळ इलेक्ट्रिक वाहनांचा असेल. इथेनॉलचा वापर मोठ्या प्रमाणात होणार असून शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल. महाराष्ट्र चेंबरने राज्याचा जिल्हावार अभ्यास करून महाराष्ट्राच्या विकासाची ब्लु प्रिंट तयार करून द्यावी व महाराष्ट्र चेंबरचे नुतन अध्यक्ष ललित गांधी निश्चितच महाराष्ट्राच्या विकासाची ब्लु प्रिंट तयार करून त्यावर काम करतील याची खात्री असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

चेंबरच्या प्रथेप्रमाणे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अध्यक्षीय ट्रॉफी देऊन नूतन अध्यक्ष ललित गांधी यांचे पदग्रहण करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चरच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ व अर्थसंकल्पानंतर महाराष्ट्रातील विकासाची नवी दिशा याविषयावर परिषद व मार्गदर्शन असा संयुक्त कार्यक्रम केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी व केंद्रीय वित्त राज्यमंत्री श्री. भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दिनांक

५ फेब्रुवारी, २०२२ रोजी मुंबई येथे संपन्न झाला. सदर परिषदेचे फेसबुक, युट्युब, ट्विटरच्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात आले.





सुरवातीला महाराष्ट्र चेंबरचे ४० वे अध्यक्ष कोल्हापूर येथील प्रसिद्ध उद्योजक ललित गांधी यांनी चेंबरच्या महोत्सवी वर्षापर्यंतच्या ६ वर्षांची ब्लु प्रिंट सादर केली. ज्यामध्ये महाराष्ट्राच्या ६ विभागासाठी ६ महिला उद्योजिका क्लस्टर, कृषिपूरक उद्योगांचे क्लस्टर व उत्पादन आधारित उत्पादनांचे ६ क्लस्टर चेंबरच्या पुढाकाराने उभारण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. तसेच चेंबर तर्फे सभासद व सहयोगी सभासद संस्थांच्या सभासदांना व्यापार विकासासाठी वेबसाईट व डिजिटल प्लॅटफॉर्म मोफत उपलब्ध करून आहे. तसेच चेंबर तर्फे उत्पादक ते विक्रेता अशा व्यापार वृद्धीसाठी व सभासदांच्या व्यापार वृद्धीसाठी लवकरच ॲप उपलब्ध करून देणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

केंद्रीय वित्त राज्यमंत्री श्री. भागवत कराड यांनी देशाच्या अर्थसंकल्पात विकासाच्या अनेक योजना केंद्र सरकारने जाहीर केल्या आहेत. आजादी का अमृत महोत्सव साजरे करत असतांना पुढचे २५ वर्षांचा काळ हा अमृत काळ असेल. त्यादृष्टीने सरकारने काम सुरु केले आहे. क्रिप्टो करन्सीला सरकारने मान्यता दिलेली नाही त्यावर ३० टक्के कर आकारण्यात आल्याचे सांगितले. देशात ७५ डिजिटल बँक सुरु करण्यात येत आहे. डिजिटल करन्सी आल्यावर पारदर्शकता येईल. भ्रष्टाचार संपुष्टात येईल. राज्याच्या व देशाच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या योजना समजून घ्या व त्याचा प्रचार प्रसार करून सर्वांना त्याचा फायदा मिळण्यासाठी योजनांची अंमलबजावणी करा. राज्याच्या व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी एकत्र येऊन काम करू असे प्रतिपादन डॉ. भागवत कराड यांनी केले.

माजी वस्त्रोउद्योग मंत्री प्रकाश आवाडे व माजी मंत्री राज के. पुरोहित यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे ४० वे अध्यक्ष ललित गांधी, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, केंद्रिय वित्त राज्य मंत्री डॉ. भागवत कराड, वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी, विश्वस्त मंडळाचे चेअरमन श्री. आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष श्री. करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष श्री. रवींद्र माणगावे, माजी वस्त्रोउद्योग मंत्री श्री. प्रकाश आवाडे , माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा उपस्थित होते. याप्रसंगी नूतन पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व तज्ञ समिती चेअरमन, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर यांचा सत्कार अध्यक्ष ललित गांधी, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, केंद्रिय वित्त राज्य मंत्री डॉ. भागवत कराड, माजी वस्त्रोउद्योग मंत्री श्री. प्रकाश आवाडे, विश्वस्त मंडळाचे चेअरमन श्री. आशिष पेडणेकर, माजी अध्यक्ष सौ. मीनल मोहाडीकर, श्री. संतोष मंडलेचा यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार केला.

उपस्थितांचे स्वागत व पाहुण्यांचा परिचय वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. उमेश दाशरथी यांनी केले. सूत्रसंचालन उपाध्यक्ष श्री. रवींद्र माणगावे यांनी तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष श्री. करुणाकर शेट्टी यांनी मानले.

कार्यक्रमास विश्वस्त खुशालचंद्र पोद्दार, माजी अध्यक्ष श्री. शंतनु भडकमकर, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे, सचिव विनी दत्ता, कार्यकारिणी सदस्य, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆◆◆

# पदग्रहण चेंबरच्या पदाधिकाऱ्यांचे...

## मॅनेजिंग कमिटी



**श्री. उमेश दाशरथी**
वरिष्ठ उपाध्यक्ष



**श्री. करुणाकर शेट्टी**
उपाध्यक्ष - मुंबई १



**सौ. शुभांगी तिरोडकर**
उपाध्यक्षा - मुंबई २



**श्री. सुधाकर देशमुख**
उपाध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र



**श्री. रवींद्र माणगावे**
पश्चिम महाराष्ट्र



**श्री. चंद्रशेखर पुनाळेकर**
उपाध्यक्ष, कोकण

## एक्सपर्ट कमिटी




**श्री. डी. बी. सोनी**
चेअरमन, उर्जा समिती



**श्री. वसंत मेस्त्री**
चेअरमन,
स्कील कौन्सिल समिती



**श्री. अभय कुंडलिया**
चेअरमन, बंदरे विकास
आणि लॉजिस्टिक समिती



**श्री. आशिष नहार**
चेअरमन, सूक्ष्म, लहान आणि
मध्यम उद्योग (PR) समिती



**श्री. संजय चोरडिया**
चेअरमन, शिक्षण आणि
प्रशिक्षण समिती



**सौ. धनश्री हरदास**
चेअरपर्सन,
पर्यावरण समिती



**सौ. संगिता पाटील**
चेअरपर्सन,
महिला उद्योजक समिती



**श्री. संदीप भंडारी**
चेअरमन,
युथ उद्योजक विंग



**श्री. प्रदीप पेशकार**
चेअरमन, शासकीय
समन्वय समिती



**सौ. नेहा खरे**
चेअरपर्सन,
उद्योजक विकास समिती

# सामान्यांच्या पैशांतून राष्ट्रीय महामार्ग !

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची अभिनव कल्पना




**समारंभास मार्गदर्शन करताना केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी व्यासपीठावर आम. प्रकाश आवाडे, अध्यक्ष ललित गांधी, केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड, ट्रस्ट बोर्ड चेअरमन आशिष पेडणेकर, संतोष मंडलेचा.**

**मुंबई** : विदेशी गुंतवणूकदारांऐवजी सर्वसामान्य नागरिकांकडून पैसे घेऊन राष्ट्रीय महामार्ग बांधण्याची संकल्पना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मांडली आहे. याद्वारे गरिबांना श्रीमंत करण्याची योजना राबवण्याचा विचार आहे. त्यासाठी किमान एक लाख रुपये गुंतवलेल्यांना ८ टक्के वार्षिक व्याजदराने परतावा देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या योजनेसाठी सेबीकडे अर्ज केला असून त्यास मंजुरी मिळाल्यानंतर ती राबवण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' ने आयोजित केलेल्या 'नवीन अर्थसंकल्पीय दृष्टीकोनातून महाराष्ट्राच्या विकासवाटा' या परिषदेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून नितीन गडकरी बोलत होते. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांची या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती.

पेट्रोल व डिझेलच्या अतिवापरामुळे दळणवळणाचा खर्च वाढत असल्याने निर्यातीहून अधिक खर्च आयातीवर होत आहे. दळणवळण खर्चाला कात्री लावण्यासाठी राज्याने साखर, मका आणि तांदळासारख्या अतिरिक्त उत्पादन होणाऱ्या पदार्थांचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी करावा, असे मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी व्यक्त केले. तसेच जिल्हा व विभागनिहाय विकासाचे नियोजन केले, तरच राज्याचा सर्वांगीण विकास होईल, असा मोलाचा सल्लाही त्यांनी यावेळी राज्य शासन आणि 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' संघटनेला दिला.

नितीन गडकरी यांनी राज्यातील उद्योगांच्या भरभराटीसाठी लॉजिस्टिक खर्च कमी करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. ते म्हणाले की, दळणवळण खर्च हा उद्योग क्षेत्रातील सर्वात मोठी समस्या आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकून राहण्यासाठी हा खर्च कमी करण्याची नितांत गरज आहे.



अमेरिकेत आणि युरोपियन देशांत दळणवळण खर्च हा एकूण खर्चाच्या १२ टक्के असून चीनमध्ये तो फक्त ८ ते १० टक्क्यांपर्यंत आहे. याउलट भारतात हाच खर्च १४ ते १६ टक्क्यांच्या घरात जातो. लॉजिस्टिक खर्च कमी करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागतील. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय २ लाख कोटी रुपयांचे लॉजिस्टिक पार्क बांधत असून महाराष्ट्रातील व्यापाऱ्याने राज्य शासनाच्या मागे लागून त्याचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच लॉजिस्टिक खर्चात कपात करण्यासाठी मल्टिमॉडल हब विकसित करण्याची त्यांनी सूचना केली. त्यासाठी राज्य सरकारने जमीन देऊन ५० टक्के निधी दिल्यास उर्वरित रक्कम देण्याचे आश्वासितही केले. देशात आता २० महामार्गावर विमान उतरवण्याची सुविधा असल्याचे सांगताना महाराष्ट्रातील सांगली येथील लॉजिस्टिक पार्कमध्येही अशीच सुविधा उभारणार असल्याची माहिती गडकरी यांनी दिली.

केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ. भागवत कराड म्हणाले की, कोरोना काळात एमएसएमईला अडीच लाख कोटी रुपयांची मदत केली, तर ९५ लाख एमएसएमई बंद होण्यापासून वाचवल्या. त्यामुळे ५ कोटी लोकांचे रोजगार कायम राहिले. सरकारने डिजिटल बँकिंग आणि डिजिटल चलनाला चालना देण्याचा निर्णय घेतला आहे. याचाच भाग म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापारवृद्धीसाठी ७५ डिजिटल बँक काढण्याचा निर्णय घेतल्याचे डॉ. कराड म्हणाले.

या परिषदेत नवनियुक्त अध्यक्ष ललित गांधी यांनी नितीन गडकरी यांच्या हस्ते पदभार स्वीकारला. तसेच, नवीन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा यावेळी पार पडला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि डॉ भागवत कराड यांच्या उपस्थितीत एमएसीसीआयए आणि कन्व्हर्जन्स एनर्जी सर्विसेस लिमिटेड (सीईएसएल) दरम्यान परस्पर सामंजस्य करार झाला. इन्क्युबेसन क्षेत्रातली आघाडीची संस्था मराठवाडा एक्सलेटर ग्रोथ फॉर इन्क्युबेशन कौन्सिल (मॅजिक) आणि एमएसीसीआयएदरम्यान परस्पर सामंजस्य करार झाले. तसेच

भारत अमेरिका निर्यातदार परिषदेच्या (यूएसआयसी) चषकाचे अनावरण पार पडले.

**फ्लेक्स इंजिनमुळे प. महाराष्ट्राची भरभराट**

फ्लेक्स इंजिनमध्ये पेट्रोलवर चालणारी मोटार सायकल, स्कूटर, तीनचाकी किंवा चारचाकी हे सगळे आता १०० टक्के बायो इथेनॉलवर चालणार आहेत. महाराष्ट्रात पेट्रोलऐवजी शेतकऱ्यांचे इथेनॉल वापरले गेले, तर पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यापासून ग्रामीण महाराष्ट्राची अर्थ व्यवस्था बदलेल.

**...तर अर्धे साखर कारखाने संपले असते!**


राज्यातील अतिरिक्त साखरेपासून इथेनॉलनिर्मिती करण्यावर भर देण्याचे आवाहन नितीन गडकरी यांनी केले. ते म्हणाले की, इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात पेट्रोलमध्ये ११ टक्के इथेनॉल वापरण्याचा निर्णय घेतला आहे. साखरेच्या मागणी व पुरवठ्याचे गणित चुकल्यामुळे नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. यावेळी ब्राझिलमधील दुष्काळामुळे साखर कारखानदारांच्या गालावर हसू आहे. राज्यात इथेनॉल आणला नसता, तर राज्यातील अर्धे साखर कारखाने संपले असते, असेही त्यांनी सांगितले.

**नाहीतर कोल्हापूरमधील ऊस जाळावा लागेल!**

देशात साखरेची गरज २४० लाख टन असून गेल्यावर्षी उत्पादन ३१० लाख टन होते. यंदा ते ३३० लाख टनमध्ये जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात पुढील वेळी ऊस जाळावा लागेल, अशी भीती वाटते. कोल्हापूरची अर्थव्यवस्था ही उसामुळे चांगली आहे. फ्लेक्स इंजिनचा वापर ६५ ते ७० टक्क्यांपर्यंत वाढला, तर पेट्रोल इंजिनची जागा इथेनॉल घेणार आहे. त्यामुळे इथेनॉलची मागणी वाढेल आणि राज्यातील शेतकऱ्यांचा फायदा होईल. तसेच प्रदूषणही कमी होईल, असे गडकरी म्हणाले.

**साखर व कापूस, हल्दीयामार्गे बांगलादेशला पाठवा!**

लॉजिस्टिक खर्च कमी करण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील सिंधी आणि जालना येथे ड्रायपोर्ट सुरु करण्यात आले आहेत. लवकरच सोलापूर, सांगली आणि नाशिक येथे ड्रायपोर्ट सुरु करणार असल्याचे नितीन गडकरी यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, या प्रकल्पांमध्ये साठवणूक, प्रीकूलिंग प्लान्ट आणि उत्पादन प्रक्रिया सुविधा उपलब्ध आहेत. आता नागपूर




केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ. भागवत कराड


येथून संत्रा, सूत आणि कापड थेट हल्दीवाला पाठवले जाईल आणि तिथून बांगलादेशात जाईल. यामुळे प्रवासखर्चात मोठी बचत होणार आहे. अशाच प्रकारे अतिरिक्त साखर व कापूस विक्रेत्यांनी रेल्वेच्या माध्यमातून हल्दीयामार्गे बांगलादेशला पाठवण्याचा सल्ला त्यांनी दिला.

**देशाला साडेचार हजार कोटी लिटर इथेनॉलची गरज**

देशात साखरेसह मका आणि तांदळाचेही अतिरिक्त उत्पादन होत आहे. म्हणूनच साखरेसह तांदूळ आणि मक्यापासून इथेनॉल निर्मितीला परवानगी दिली आहे. देशास साडेचार हजार कोटी लिटर इथेनॉलची गरज आहे. देशात ८ लाख कोटी रुपयांचे आयात केले जात आहे. असेच सुरू राहिले, तर पुढील पाच वर्षात पेट्रोलियम व गॅस आयातीसाठी २५ लाख कोटी रुपयांची गरज भासेल. २५ टक्के कोळसा आयात होत आहे. अर्थव्यवस्थेची सर्वात कमकुवत बाजू म्हणून लागणारी पॉवर आणि एनर्जी ही आयात करावी लागत आहे. म्हणूनच या दृष्टीने आपण स्वयंपूर्ण झालो, तर इथेनॉलनिर्मितीमुळे सुमारे ५० लाख युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

# ‘महाराष्ट्र चेंबर पत्रिके’चे व्यापार-उद्योग विकासात महत्त्वपूर्ण योगदान : दीपक कपूर

## माहिती महासंचालक दीपक कपूर यांच्या हस्ते विशेष अंकाचे प्रकाशन

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे विविध विमानतळांच्या विकास कामासंबंधी चा प्रस्तावना दीपक कपूर यांना सादर करताना अध्यक्ष ललित गांधी दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र चेंबर पत्रिका च्या ५१ व्या वर्षातील पहिल्या अंकाचे प्रकाशन करताना माहिती महासंचालक दीपक कपूर सोबत अध्यक्ष ललित गांधी, सागर नागरे.**

**मुंबई :** ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर’ चा एक ज्वलंत इतिहास असून महाराष्ट्रातील उद्योग वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे मोठे योगदान आहे. मराठी माणसाला उद्योग निर्मितीत प्रोत्साहन देत, उद्योगवाढीसाठी ‘महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स’ यांचे काम अखंडपणे सुरू आहे.

राज्याची शिखर संस्था असलेल्या ‘महाराष्ट्र चेंबर’ तर्फे व्यापार, उद्योग, कृषीपूरक उद्योग यांच्यासाठी अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणारे मासिक सातत्याने पन्नास वर्ष प्रकाशित करून आपली उपयुक्तता सिद्ध करणाऱ्या ‘महाराष्ट्र चेंबर पत्रिके’च्या ५१ व्या वर्षाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक दीपक कपूर यांच्या हस्ते आज मंत्रालयात करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

या पुस्तक प्रकाशन प्रसंगी ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरचे’ नवनियुक्त अध्यक्ष ललित गांधी, कार्यकारिणी सदस्य समीर दूधगावकर, तसेच प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.

भारतीय उद्योजकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उद्योग व व्यापारात अग्रेसर ठेवण्यात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सला ९५ वर्षांचा गौरवशाली इतिहास आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण, शहरी, लहान-मोठे, उद्योजक, व्यापारी आणि व्यावसायिकांसाठी ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर’ च्या माध्यमातून कार्य करीत आहे. याचे कौतुक श्री. दिपक कपूर यांनी यावेळी केले.

याप्रसंगी ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या’ वतीने ललित गांधी यांनी श्री. दिपक कपूर यांना ‘भगवद गीता’ हा ग्रंथ भेट तसेच शाल देऊन सत्कार करण्यात आला.

# कृषी, पायाभूत सुविधा व स्टार्ट अप क्षेत्रासाठी भरीव तरतुदी स्वागतार्ह - ललित गांधी

## ‘महाराष्ट्र चेंबर’ व ‘साम टीव्ही मराठी’ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘अर्थसंकल्प २०२२’ चे थेट प्रक्षेपण




**महाराष्ट्र चेंबर व साम न्युज तर्फे आयोजित अर्थसंकल्प २०२२ च्या चर्चासत्रात सहभागी अध्यक्ष ललित गांधी.**

‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर’ व ‘साम टीव्ही मराठी’ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. १ फेब्रुवारी २०२२ रोजी अर्थसंकल्प २०२२ चे विश्लेषण, महाराष्ट्र चेंबरचे पदाधिकारी व विविध विषयातील तज्ञांच्या प्रत्यक्ष सहभाग व मार्गदर्शनासह महाराष्ट्र चेंबरच्या मुख्य कार्यालयातून संपूर्ण दिवस थेट प्रक्षेपण करण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी, रवींद्र मानगावे, कर तज्ञ कांतीलाल तातेड व इतर मान्यवरांनी अर्थसंकल्प विषयी आपली मते मांडली.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सादर केलेला अर्थसंकल्प व्यापार व उद्योग क्षेत्रासाठी तितकासा आशादायक नाही असं म्हणावं लागेल परंतु त्याच बरोबर केंद्र सरकारने या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला आहे व शेती क्षेत्राच्या विकासावर भर दिला आहे. या दोन्ही गोष्टींचा फायदा अप्रत्यक्षपणे व्यापार उद्योगाला होणार आहे. सर्वसाधारणपणे या अर्थसंकल्पाचे वर्णन करायचं झालं तर शेती व पायाभूत सुविधांच्यावर भर देणारा विकासपूरक अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर’ चे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केली.

व्यापार आणि उद्योग या दोन्ही क्षेत्र गेल्या दोन वर्षाच्या कोरोना कालखंडामध्ये फार मोठ्या नुकसानीला सामोरे गेले आहे. या दोन्ही क्षेत्रासाठी सरकार कोणती ना कोणती थेट मदतीची योजना लागू करेल अशी अपेक्षा होती ती अपेक्षा मात्र या अर्थसंकल्पात पूर्ण झाली नाही. मात्र शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, नऊ लाख हेक्टर नवीन जमीन शेतीखाली आणणे याबरोबरच शेतीला एमएसपीसाठी दोन लाख कोटींची तरतूद या काही चांगल्या गोष्टी शेतीच्या विकासासाठी केल्या आहेत. अजूनही बरेच काही करता येणे शक्य आहे ते सरकार करेल अशी अपेक्षा व्यक्त करुन ललित गांधी म्हणाले की, २५ हजार किलोमीटरचे




नवीन रस्ते,चारशेहून अधिक वंदे भारत रेल्वे आणि शंभर कार्गो टर्मिनल या पायाभूत सुविधांचा फायदा व्यापार, उद्योग क्षेत्राला मोठ्या प्रमाणात होणार आहे.

स्टार्टअप इंडस्ट्रीला इन्कमटॅक्सचा इन्सेन्टिव्ह १ वर्षाने वाढवून दिला. अर्थात कोरोनामुळे ते वाढवून देणे क्रमप्राप्तच होते. याबरोबर कृषी क्षेत्रातल्या स्टार्टअपसाठी नाबार्डकडून थेट कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय अतिशय चांगली गोष्ट असल्याचे सांगून ललित गांधी पुढे म्हणाले की, नाबार्डकडून हा कर्जपुरवठा होताना सहज, सुटसुटीत व कमी व्याजदरात होणे अपेक्षित आहे. नाबार्डच्या नेहमीच्या बँकिंग पद्धतीने करून चालणार नाही तर व्हेंचर कॅपिटल व एन्जल गुंतवणूकदाराच्या दृष्टिकोनातून हा कर्जपुरवठा स्टार्टअपला मिळाला तर त्याला खऱ्या अर्थाने उपयोग होणार आहे.

कृषी क्षेत्राच्या स्टार्टअपसाठी नाबार्डने दिलेले अर्थसहाय्य कृषी क्षेत्राच्या विकासाला पूरक ठरणार असून तरुणांना नवीन संकल्पना साकार करण्यासाठी त्याचा फायदा होणार आहे.

कर रचनेतील बदलाबद्दल बोलतांना ललित गांधी म्हणाले की, सरकारने पायाभूत सुविधांसाठी विकास करताना इन्कम टॅक्समध्ये रिफॉर्म करतांना कररचनेत कुठलाही बदल केलेला नाही. १८ टक्के केलेला कार्पोरेट टॅक्स स्वागतार्ह असून पार्टनरशिप फर्म, एल एलपीला सुद्धा या दर रचणेमध्ये आणणे गरजेचे होते हि तफावत फार मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे हा या पार्टनरशिप फर्म आणि एलएलपीवर अन्याय करणारी गोष्ट आहे. सरकारने यामध्ये दुरुस्ती करावी अशी सरकारकडून अपेक्षा असल्याचे ललित गांधी म्हणाले.

एकूणच हा अर्थसंकल्प पायाभूत सुविधांच्या दृष्टीने दीर्घकालीन धोरण ठरवणारा असा अर्थसंकल्प आहे त्यामुळे तात्कालिक लाभाची जी अपेक्षा होती किंवा सहाय्याची, म दतीची अपेक्षा होती मात्र यात पूर्ण झालेली नाही अशी खंत ललित गांधी यांनी व्यक्त केली.

# MICRO ENTERPRISE

## ENGINE OF ECONOMIC GROWTH



**Mr. Gautam E. Thakur**
Chairman
The Saraswat Co-Op. Bank Ltd.

**Introduction :**

Growth and development of MSMEs is vital for healthy growth of our economy. The main objectives behind creating MSMEs are the creation of job opportunities increase standard of living, regional balance, mobilization of local skills and capital etc. It has contributed most significantly for the development and promotion of first generation enterprises. Promotion of Small scale industries has been one of the main strategies for economic development of the developing countries since 1950s. MSMEs are able to tap latent resources and makes use of indigenous resources for producing goods and services. The Micro, Small and medium Enterprises (MSMEs) are considered as the backbone of India Economy. These Enterprises are engaged in manufacturing and service activities. As per information received from Central Statistics Office, Ministry of Statistics & PI, the Share of MSME 2019-20 was 30%. It is estimated that in terms of value, the MSME sector accounts for about 45 % of manufacturing outputs and 40 % of the total exports of the country. Employment distributed is about 595 lakh persons in over 261 lakh enterprises throughout the country. There are over 6000 products ranging from tradition to high-tech items, which are being manufactured by MSMEs in India.

Over the past couple of years, we have seen a steady increase in the share of MSMEs and our country is now aiming towards increasing the MSME share to 50%.

**Market Size :**

India has approximately 6.3 crore MSMEs. As per data from the MSME Ministry, as of November 26, 2021, the Udyam Registration portal registered 5,767,734 MSMEs, replacing the former process of filing for an Udyog Aadhaar Memorandum (UAM). Registered micro-enterprises stood at 5,441,220 (94.34%), followed by small enterprises at 293,555 (5.09%) and midsized enterprises at 32,959 (0.57%). As of November 26, 2021, under the top five state-wise Udyam registrations, Maharashtra recorded maximum number of registrations with 12.18 lakh units, followed by Tamil Nadu (6.23), Gujarat (4.86), Rajasthan (4.68) and Uttar Pradesh (4.45). New online system of MSME/Udyam Registration launched by the Union MSME Ministry, w.e.f. July 01, 2020, successfully registered >5.7 million MSMEs until November 2021. The Indian MSMEs sector contributes about 29% towards the GDP through its national and international trade.

**DEFINITION :**

Prior to 2020, the MSMEs were classified based on the investment in Plant & Machinery and Equipment. Now the revised definition is as under:

| Parameters | Micro | Small | Medium |
|---|---|---|---|
| Investment in Plant and Machinery | Less than Rs. 1.00 Crore | Less than Rs. 10.00 Crore | Less than Rs. 50.00 Crore |
| Annual Turnover | Less than Rs. 5.00 Crore | Less than Rs. 50.00 Crore | Less than Rs. 250.00 Crore |

Government of India has broadened the definition and has also created a platform for "Udyam Registration" of MSMEs.

**SEGMENT –WISE DISTRIBUTION :**

The segment wise split of number if units under Micro, Small and Medium Enterprise based on the Udyam registration data reveals :

(Numbers in Units)

| | Micro | Small | Medium | Total |
|---|---|---|---|---|
| India | 89,62,423 (89%) | 12,20,206 (11.5%) | 49,839 (0.50%) | 1,02,32,468 |
| Maharashtra | 17,39,564 (87%) | 2,29,031 (11.5%) | 9,941 (0.50%) | 19,78,536 |

#Source : Ministry of MSME, GOI-Udyog Aadhar registrations upto FY 2021

To the total of 1,02,32,468 units under MSMEs, Maharashtra with its 19,78,536 units, contributes to around 19% under this sector.

From the above table it is clear that Micro Enterprise forms a major share of the MSME segment, this is across India and the same is applicable in Maharashtra.

**EMPLOYMENT OPPORTUNITIES:**

The MSME sector also provides a huge source for employment. The segment-wise employment offered in Rural and Urban areas to the number of persons is as under:

(Numbers in lakh)

| Sector | Micro | Small | Medium | Total | Share(%) |
|---|---|---|---|---|---|
| Rural | 489.30 | 7.88 | 0.60 | 497.78 | 45% |
| Urban | 586.88 | 24.06 | 1.16 | 612.10 | 55% |
| Total | 1076.19 | 31.95 | 1.75 | 1109.89 | 100% |

#Source: Annual report 2020-21 MSME (from Ministry of MSME India)

**Road Ahead**

The Government of India has envisioned doubling the Indian economy to US$ 5 trillion in five years. In order to achieve this goal, career opportunities for the young population have been generated and MSMEs have the potential to serve as a key employment generator.

As can be seen from the table, Micro Enterprises employ 97% of people employed in the MSME sector.

It is evident that Micro Enterprise are engines of job growth in India and thousands of these clusters have created jobs for millions of individuals, and fostering such entrepreneurship is the key to address our major employment challenge.

While Micro Enterprises have an impact on the economic growth, it is important that factors important for the growth of Micro Enterprises are taken into consideration. Ease in the availability of credits, guidance for skill development and support from Govt. by way of subsidy and subvention will encourage more individuals towards Entrepreneurship. The government should invest in providing more back-end services to improve performance of the MSME sector as it supplies goods and services to big industrial enterprises. Globally available technology could be subsidised by the government so that the product quality of MSME players can be improved using the existing resources.



# किसान/कृषी ड्रोन्स व भारतातील शेतीचे भविष्य

**आजकाल भारतीय शेतकरी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास इच्छुक दिसत आहे. पारंपारिक पद्धतीने शेती करणारे शेतकरी आधुनिक तंत्रज्ञान अगदी सहज वापरताना दिसत आहे व त्यासोबत खुप चांगले शेती व्यवस्थापन करत आहेत. फल स्वरूपात त्यांचे पिक व त्यामुळे होणाऱ्या उत्पन्नात चांगलीच वाढ झालेली दिसून येत आहे. खरंच कौतुक वाटते या आधुनिक बळीराजाचे... प्रिसिजन फार्मींग प्रणाली या बळीराजाने अवगत केलीच आहे आणि आता अजून एक नविन प्रणाली येवू घातली आहे, ती म्हणजे ड्रोन फार्मिंग होय. कृषी ड्रोन्स ची चाचणी बऱ्याच शेतकऱ्यांनी, विशेषतः कीटकनाशक फवारणीसाठी केली आहे. कृषी ड्रोन द्वारे फवारणी केल्याने बरेच मोठे क्षेत्र काही क्षणातच फवारून होते. त्यामुळे वेळ व पैसा दोन्ही गोष्टी वाचण्यात मदत होते. चला तर जावून घेवूया, ही कृषी ड्रोन प्रणाली आणि त्या सर्व काही...**

शेती व्यवसायात सध्यस्थितित ड्रोन अथवा यू ए वी (Unmanned Arial Vehicle) चा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. यात ड्रोन चे अनेक उपयोग आहेत, जसे की पिकाचे सध्यस्थितीतील निरिक्षण करणे, पिकांच्या वाढी मधील विविध जैविक टप्प्यांचे निरिक्षण करून होणाऱ्या बदलांची नोंद ठेवणे, तयार पिकांचे सर्वेक्षण करणे, पिंकावरील रोग प्रतिबंधक किटकनाशकांची फवारणी करणे, शेतातील मातीचे ड्रोन इमेज द्वारे पृथकरण करणे, आणि असे बरेच काही..

या सर्व कार्य प्रणाली कार्यान्वित करण्या साठी ड्रोन वर विविध सेन्सर्स (Sensors) बसवलेले असतात, जसे की आरजीबी (RGB Sensors), इन्फ्रारेड सेंसर, मल्टीस्पेक्टरल किंवा हायपरस्पेक्टरल सेंसर, थर्मल कॅमेरा सेंसर आणि लीडार

इत्यादी. या सेंसर्स द्वारे जी माहिती संकलित केली जाते त्या आधारे पिकांवरिल विविध निकष काढले जातात. त्याआधारे पिकांवरिल रोगाचे व्यवस्थापन केले जाते. पिकाबाबतचे सरकारी धोरण ठरवण्यासाठी देखील हि माहिती उपयुक्त ठरू शकते.

अवकाळी पाऊस, गारा, वादळ या मुळे बऱ्याचवेळा पिकांचे नुकसान होते. शेतकरी त्याची नुकसान भरपाई व्हावी यासाठी शेतविमा काढतो. त्यासाठी झालेल्या नुकसानीचा पंचनामा करावा लागतो. तो करण्यासाठी येणारे विम्याचे सर्वे क्षण पथक बऱ्याचदा उशिरा पोहचते व काही कारणास्तव पिकनुकसानीचा योग्य मोबदला मिळत नाही. या अडचणीवर मात करण्या साठी अशा परिस्थीतीत ड्रोन द्वारे त्वरित पीकनुकसानीचे सर्वेक्षण करता येवू शकते व त्या माहितीद्वारे पिकविम्याचा योग्य तो मोबदला शेतकऱ्यास मिळू शकतो. तंत्रज्ञानाच्या या वापरात मानवी फेरफार टळता येत असल्याने विमा अधिकार्यास अचूक माहिती मिळते, त्या आधारे तो पिक विम्याचे मुल्य ठरवू शकतो.

नाशिक शहर 'ग्रेप सिटी' म्हणून प्रसिद्ध आहे. मोठा वायनरी उद्योग शहरात आहे जिथे मोठ्या प्रमाणांत द्राक्षाची लागवड केली जाते. या द्राक्ष बागेचे रोजचे निरिक्षण करणे, लागणारे खत व पाण्याचे नियमन करणे, पर्यावरणात अनपेक्षित होणार्या बदला मुळे द्राक्षवर रोग पडू नये याची काळजी घेणे, कीटक नाशकाची फवारणी करणे, द्राक्ष कापणीला येईपर्यंत त्यांची देखभाल करणे हे सर्व कामे शेतकऱ्याला करावी लागतात. त्या साठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज पडते व ती कधी कधी वेळेत पुर्ण होवू शकत नाही. पर्यायाने द्राक्ष बागेचे नुकसान होवू शकते. किटक नाशकाची फवारणी करताना गरज नसलेल्या ठिकाणी अनावश्यक फवारणी होते, ह्यामुळे किटक नाशकाची नासधूस होते. त्याचा अतिरिक्त बोजा शेतकऱ्याच्या खिशावर पडतो. तसेच आति प्रमाणांत फवारनीमुळे तयार झालेली रसायन आपल्या पोटात जावून शारिरीक नुकसान होते ते वेगळेच. कृषी ड्रोन द्वारे केलेल्या फवारनीने हे सर्व टाळता येऊ शकते व अतिरिक्त रसायनाचा वापरही कमी होवुन फवारनी साठी लागणारे मनुष्यबळही कमी लागेल. परिणामस्वरुप शेतऱ्याचा वेळ आणि पैसा वाचेल, त्याच्या उत्पन्नात वाढ होईल.

या कृषी ड्रोनचे जसे फायदे आहेत तसे काही समस्या पण आहेत. जसे की ड्रोन विकत घेण्यासाठी लागणारा पैसा, द्रोण उडवण्यासाठी लागणारे प्रशिक्षित माणसे, ड्रोनच्या देखरेख (maintainance) साठी लागणारा खर्च इ. असे असतील तर ही एकदाच लागणारी गुंतवणूक आहे व त्यामागील परतावा सुद्धा शेतकऱ्यांच्या हातात असणार आहे. कृषी ड्रोन वापरण्यासाठी जी प्रशिक्षित माणसे लागतील ती औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील (ITI) विद्यार्थ्यांद्वारे उपलब्ध केली जाऊ शकते. अशाने त्यांच्या नौकरी चा पर्यायही खुला होईल.

सध्याचा जमाना स्टार्टअप चा आहे. सर्व शेतकऱ्यांना ड्रोन विकत घेणे शक्य नसल्याने, एखाद्या कृषी स्टार्टअप द्वारे ही सुविधा ईतर शेतकऱ्यांना भाडे तत्त्वावर उपलब्ध करून दिली जाऊ शकते. उद्योजकता विकासा कडे जाणारे हे पुढचे पाऊल ठरेल.

ड्रोन उद्योगाकडे सरकार गांभीर्याने घेत आहे व या प्रणाली कडे सकारात्मकतेने बघत आहे. ड्रोन बाबतचे नियमही काही अंशी शिथिल केले गेले आहेत. काही PLI (Production Linked Incentive scheme) सारख्या योजनाही आमलात आणल्या जात आहेत. तसेच नुकत्याच येऊ घातलेल्या आर्थिक अंदाज पत्रकातही ड्रोन उद्योगा बाबत (ड्रोन शक्ति) तरतूद केली गेली आहे. चला तर मग शेतकरी बंधूंनो, या कृषी ड्रोन कडे एका क्रांतिकारी नजरेने बघुया व या क्रांतिकारी युगाचे स्वागत करूया, साक्षीदार बनू या!




**Dr. Gayatri Phade**
Prof. & Head Electronics & Telecommunication
Sandip Institute of Technology &
Research Centre, Nashik

# महाराष्ट्र चेंबरच्या पर्यटन परिषदेत सहभागी होऊ - जी.किशन रेड्डी

## केंद्रीय पर्यटन मंत्रालयातर्फे महाराष्ट्रासाठी विशेष योजनेचे आश्वासन





१. ललित गांधी यांचा सत्कार करताना केंद्रीय मंत्री नाम. जी. किशन रेड्डी.

२. नाम. रेड्डी यांना महाराष्ट्र चेंबर च्या पर्यटन धोरण अहवाल सादर करताना ललित गांधी, संदिप भंडारी, मुकेश चौहाण.

महाराष्ट्राच्या व्यापार, उद्योग, कृषि व सेवा उद्योगाची शिखर संस्था असलेल्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' तर्फे आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय पर्यटन परिषदेत भारत सरकारचा पर्यटन विभाग सहभागीता करेल अशी ग्वाही केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक कार्य मंत्री नाम. जी.किशन रेड्डी यांनी केले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय पर्यटन यांनी यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांना परिषदेचे आमंत्रण दिले तसेच महाराष्ट्रातील पर्यटन विषयक विविध मागण्यांचे निवेदन सादर केले त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी केंद्रीय मंत्री नाम. जी.किशन रेड्डी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ललित गांधी यांचा सत्कार केला.







# ‘महाराष्ट्र चेंबरने’ राज्यातील शिक्षण संस्था व उद्योगजगताच्या विकासाकरीता समन्वय साधावा - राज्यपाल भगतसिंह कोश्यारी

## उद्योगांच्या प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज भागविण्यासाठी वर्षभरात ३0000 विध्यार्थ्यांना प्रशिक्षण देणार : ललित गांधी

**मुंबई** : राज्यातील उद्योग, व्यापार क्षेत्राच्या माध्यमातून शिक्षण संस्थांचा विकास साधण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने निवेदनाद्वारे केलेल्या सूचनाबाबत सकारात्मक विचार करून अंमलबजावणी करण्यात येईल अशी ग्वाही महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी यांनी दिली. महाराष्ट्र चेंबरने राज्यातील शिक्षण संस्था व उद्योगजगताच्या विकासाकरीता समन्वय साधावा असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी प्रास्ताविक करताना शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या व उद्योग, व्यापार क्षेत्रांकडून उपलब्ध करून देण्यात येणारे रोजगार तसेच शिक्षण संस्था आणि व्यापार, उद्योग यांचा योग्य तो समन्वय साधण्याचे कार्य महाराष्ट्र चेंबर करेल असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने राज्यपाल श्री.भगतसिंह कोश्यारी यांची राजभवन येथे भेट घेऊन उद्योगांला प्रशिक्षित मनुष्यबळ, कौशल्याधारित शिक्षण, सरकारने सुरु केलेल्या विविध योजना व शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या याविषयावर चर्चा केली.

महाराष्ट्र राज्याला अग्रेसर राज्य बनविण्याच्या दृष्टीने केलेल्या भरीव कार्याबद्दल महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.



राज्यपाल भगतसिंह यांना राज्यातील शिक्षण व उद्योग प्रशिक्षण प्रकल्प अहवाल सादर करताना ललित गांधी, सोबत आशिष पेडणेकर, उमेश दाशरथी, करूणाकर शेट्टी, सुधाकर देशमुख, रविंद्र माणगावे, राजु पुनाळेकर, सागर नागरे.

चर्चेप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबर राबवित असलेल्या बिझनेस सोल्युशन पॉलीक्लिनिक प्रोग्राम (BSPP) या उपक्रमाबद्दल माहिती दिली व उद्योगांची प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज तसेच विध्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाधारित कौशल्यावर चांगली नोकरी मिळण्याकरीता येणाऱ्या वर्षभरात ३0000 विद्यार्थ्यांना इंडस्ट्री इंटर्नशिप उपक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणाअंतर्गत विद्यार्थ्यांना उद्योगांशी जोडण्यासाठी उद्योगांची प्रक्रिया, उत्पादन, आव्हान क्षेत्र, उद्योगात येत असलेल्या विविध अडचणी यासारख्या आवश्यक मुद्यांवर मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र चेंबरने जाहीर केलेल्या महिला उद्योजकता धोरणाची थोडक्यात माहिती देऊन, महाराष्ट्र चेंबर महिलांकरीता राबवित असलेल्या कार्याची माहिती अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

राज्यातील ६ विभागात महाराष्ट्र चेंबर उभारीत असलेल्या क्लस्टरची व त्यामधून सुक्ष्म, लघु उद्योगांना मिळणाऱ्या सुविधांची माहिती वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी यांनी दिली.

शिष्टमंडळात ट्रस्ट बोर्डचे चेअरमन आशिष पेडणेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी, रवींद्र माणगवे, सुधाकर देशमुख, चंद्रशेखर पुनाळेकर, सरकार्यवाह सागर नागरे होते.

# महाराष्ट्रातील विमानतळांच्या प्रश्नांवर संयुक्त बैठक घेऊ - केंद्रीय मंत्री ज्योतीरादित्य शिंदे

## 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे अध्यक्ष ललित गांधी यांना आश्वासन

**नवी दिल्ली** : महाराष्ट्रातील विविध विमानतळांच्या विकासासंबंधी व विमानसेवांच्या विस्तारासंबंधी नागरी उड्डयण मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांची संयुक्त बैठक आयोजित करू असे आश्वासन केंद्रीय नागरी उड्डयण मंत्री नाम. ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिले.

'असोचेम' या राष्ट्रीय संस्थेच्या वतीने आयोजित हवाई वाहतुक परिषदेप्रसंगी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी नाम. ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेऊन चर्चा केली त्याप्रसंगी त्यांनी हे आश्वासन दिले.

ललित गांधी यांनी महाराष्ट्रातील कार्यरत विमानतळांच्या विस्तारीकरण, हवाई सेवांचा विस्तार, नवीन प्रस्तावित विमानतळांच्या प्रलंबित कामासंबंधीचे मुद्दे आदी विषयानंतर सिंधीया यांचेशी चर्चा केली व महाराष्ट्रातील सर्व विमानतळांच्या विषयांचे सविस्तर निवेदन सादर केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीबरोबर झालेल्या संयुक्त बैठकीचे इतिवृत्त ही त्यांनी मंत्री महोदयांना सादर केले.

विशेषतः कोल्हापूर, नाशिक, जळगांव, औरंगाबाद, नागपुर येथुन नवीन हवाई सेवांचा प्रारंभ, विमानतळ विस्तारीकरण यावर प्राधान्याने लक्ष देण्याची विनंती केली.



**केंद्रीय हवाई वाहतुक मंत्री नाम. ज्योतिरादित्य सिंधिया यांना महाराष्ट्रातील विमानसेवांच्या प्रश्नांविषयी निवेदन देऊन चर्चा करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी.**

सोलापूर विमानतळावरील प्रवासी वाहतुक नियमित सुरू होण्यामधील अडथळे दुर करणे, पुणे मुंबई येथील नवीन विमानतळांच्या कामाची गति वाढविणे.

अमरावती, अकोला, रत्नागिरी विमानतळ कार्यान्वित करणे या मुद्दयांवर प्रामुख्याने ललित गांधी यांनी नाम. ज्योतिरादित्य सिंधिया यांना प्रामुख्याने लक्ष देण्याची विनंती केली.

कोल्हापूर विमानतळास छत्रपति राजाराम महाराजांचे नाव देण्याचा निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी व्हावी अशी मागणीही यावेळी ललित गांधी यांनी केली.

तत्पूर्वी परिषदेत मार्गदर्शन करताना नाम. सिंधीया यांनी भारतात हवाई वाहतुक क्षेत्रात प्रचंड संधी असुन येत्या काळात ऑटोमोबाईल क्षेत्राप्रमाणे हे क्षेत्र प्रगती करेल असे सांगितले.

छोट्या शहरांमध्ये विमानसेवा पोहोचविणे हे भारत सरकारचे प्रमुख धोरण असल्याचे सांगुन शहरांतर्गत वाहतुकीसाठी हेलीकॉप्टर सेवांचा विस्तार करण्याचे नवीन धोरण तयार करण्यात येत असल्याचेही सांगितले.




# "BATATA" can replace all Taxes



**Vikas V. Deodhar,**
Cost Accountant
Mob. : +91 9820310489
E-mail : vvdsvd@gmail.com

**Introduction**

Tax in its present form, in my opinion, is a borrowed or copied concept, from the West. We in India, in any segment of economy, were never so Tax conscious. In today's economy, everybody works on the natural tendency of avoiding tax or somehow reducing the Tax burden. The State, in Kautilya regime, was never greedy for "tax collection" as its prime motive of Governance. It is stated in ancient literature that the Tax collection should be like honey bees collecting honey, without harming the Flowers. The Tax in the form of "Chungi" or Octroi getting collected at the Entry point of any village, city or State was acceptable Tax, prevalent in India for Centuries. The Collection at the Entry of any village or City is a primitive old fashioned activity. When the "Goods" come in the City, what is coming in is the Economic Value of the Goods coming in through the Entry Gates. Now in modern, digitised world, the global transfer of Value of Goods and Services, enters the pockets of the Value receipient through the Gateway of his Bank Account getting credited with realisation of "Transaction Value". It is appropriate, therefore, to collect the Tax at Credit Entry of every Transaction Value.

**"BATATA" - New Tax Regime.**

The present Tax Regime of India should be drastically reformed and transformed to charge a

small percentage of Gross Receipts of any Individual, Firm, Company or any other Bank Account holder-Savings or Current Account. The same may be called the Banking Transaction Tax (BATATA). The present system of Direct Tax - Income Tax on Net Income after expenses and different Tax Deductions, Tax slabs and various loopholes, provokes everybody to evade tax by hiding income, inflating expenditure and manipulating maximum Tax Deductions. The GST law provides for Tax on Value of Supply with Input Tax Credit to avoid cascading effect. With this, most of the Tiny, Micro, Small, Medium businesses will get their BATATA deducted by the Bank, at the end of every month, on the basis of Bank Credits during the month. The BATATA deducted from each and every Account-Savings and Current, will be calculated and agregated by the Bank at the end of every month and be paid to the Government on or before say 5th of next month. As a special dispensation to Salary earners, Pensioners, Professionals and such other low income group, the Gross Receipts Credited to their Bank Account, if it is not more than 50 Lakhs, the tax rate may be as low as Re.1/- per credit transaction making annual BATATA of only Rs.12/- for 12 months salary. Thus the Salary earner and petty businessman having Gross Receipt upto Rs.50 Lakhs, will have to pay only Re.1/-on every credit received in his Savings or Current Account. It should be provided as per law that this is a Banking Transaction Tax (BATATA) and complete replacement of Direct tax (Income Tax) as well as Indirect Tax (GST). After two categories of Receipients of Bank Credit transactions, (upto Rs.50 Lakhs only Re.1/- per Bank Credit Transaction, and upto Rs.2 Crores at the rate of only 1% as BATATA), the remaining all entities and receipients of gross credit in their Bank Account, more than Rs.2 Crores, may be liable to get the BATATA deducted by the Bank at the end of every month, say at a small percentage of 5% or lesser, on the gross receipts credited to their Bank Account. The BATATA being the Banking Transaction Tax, the "Transaction Value" will be the gross receipt credited to any Bank Account. Being Banking Transaction Tax, for calculation of tax liability, there will not be any deduction by way of Input Tax Credit or Business Expenditure, or Tax Incentives. The 5% BATATA will be deducted by the Bank at the end of every month and deposited with the Government say by 5th of the next month.

**Under BATATA, there will be only 3 Slabs and rates as follows :**

Receipts of any entity in all Bank accounts together, in one year

1) If Receipts are upto Rs.50 Lakhs - BATATA only Re.1/- per receipt/credit.
2) If Receipts are 50 Lakhs to 2 Crores. - BATATA only 1% of Total Receipts.
3) If Receipts are more than 2 Crores. - BATATA only 5 %.

My guess work suggests the highest Transaction tax rate of 5%. Considering the greatly widened tax base, the rate can be even less than 5%, so as to realise the same compensating Tax revenue, after removing Income Tax and GST - Revenue Neutral. After elaborate statistics, thoughtful estimates and calculations, if such Revenue Neutral rate for BATATA comes to be 4.41%, then the Budget to be approved by the legislature, can be the rate of BATATA 4.41% only. Under BATATA regime, no other Tax provisions will be required to be approved by the legislature. The BATATA to be paid to Government Treasury will be one single consolidated rate. The sharing between Union and States will be calculated by any unified authority like BATATA Council, after total payment is received. Banks or Taxpayers will not be required to divide the Tax payment into share of Union and States like CGST and SGST.

**(या लेखाचा उर्वरीत भाग पुढील अंकात..)**

# महिलांनो उद्योगातील BOSS बना!



महिलांनी आता घरातच Boss न राहता उद्योगात Boss राहील पाहिजे .आपल्यात उपजत उद्योजकीय कार्यक्षमता, इनोव्हेशन, नेतृत्व आहे तरी आर्थिक विकासाचे चालक म्हणून आपण आपली मजबूत ओळख करायला हवी. आपण नवीन पिढी ठरवतो, कुटुंबव्यवस्थेला आकार देतो, घरात सुसंवाद राखतो ,कितीही संकटे आली तरी धीराने तोंड देतो. बाह्य आधाराची अपेक्षा न करता, स्वतःच्या अडचणी स्वतः सोडवण्याचे हिंमत असलेली आत्मनिर्भरतेच्या बळावरच यशाची शिखरे गाठणारी स्त्री सहज आपल्या स्वतःच्या व्यवसायाची बॉस होऊ शकते. अशी असंख्य प्रेरणादायी महिला आहेत की त्यांचे उद्योग व व्यापार नेतृत्वाचे किस्से आपल्या वाचण्यात, बघण्यात आली असतील .त्यांचा प्रवास संघर्ष आणि अनेक पुरुषप्रधान उद्योगांमधील कर्तृत्व अद्वितीय आणि उल्लेखनीय आहे. आदित्य बिर्ला सेंटर फॉर एक्सलन्स च्या अध्यक्षा श्रीमती राजश्री बिर्ला ब्रिटिश भारतीय बिजनेस एक्झिक्यूटिव्ह ग्लोबल सीईओ लीना नायर, कायनेटिक इंजिनिअरिंग लिमिटेडच्या उपाध्यक्ष सुलज्जा फिरोदिया, पिरामल ग्रुपच्या व्हाईस चेअरपर्सन स्वाती पिरामल, रिलायन्स फाउंडेशनच्या अध्यक्ष नीता अंबानी, बायकोन लिमिटेडच्या कार्यकारी अध्यक्ष किरण मुजुमदार, इन्फोसिसच्या संस्थापिका सुधा मूर्ती, सीईओ ऑफ नायका फाल्गुनी नायर व महाराष्ट्र चेंबर च्या पहिल्या महिला अध्यक्षा तसेच आम्ही



**Mrs. Sangita Patil**
Chairperson -
Women Entrepreneurs Committee

उद्योगिनी च्या श्रीमती मीनल मोहाडीकर अशी अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत. आपणही असेच आपल्यात असलेल्या गुणांच्या कौशल्याच्या ताकदीने उद्योगाकडे वळवून स्वतःच्या अटीवर यशस्वी होता येईल.

महिला उद्योजक समितीच्या अंतर्गत आपल्या चेंबरचे अध्यक्ष श्री ललितजी गांधी यांच्या मार्गदर्शनाने महिला उद्योजकता धोरण तयार करण्यात आले आहे त्यातील प्रमुख उपक्रम खालील प्रमाणे,

- महिलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण महाराष्ट्र चेंबरतर्फे उपलब्ध करून दिले जाईल

- राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात महिला उद्योजिकांसाठी उपलब्ध असलेल्या व्यवसायाच्या संधी, राज्य व केंद्र सरकारच्या योजना याविषयी माहीती देण्यासाठी मार्गदर्शन केंद्र येत्या दोन वर्षात सुरू करण्यात येतील.
- महिलांना त्यांच्या उत्पादनांच्या निर्मितिसाठी सर्व सुविधायुक्त जागा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र महिला उत्पादन क्लस्टर्स ची उभारणी केली जाईल
- महिलांची उत्पादने विक्रिसाठी संपुर्ण राज्यात विक्रि व प्रदर्शन केंद्र उभारली जातील.
- विविध बँकांबरोबर सकार्य करार करून महिलांसाठी प्रकल्प उभारणी कर्ज सवलतीच्या व्याजदरात उपलब्ध करून दिले जाईल.
- 'महिला उत्पादन क्लस्टर्स' व 'विक्रि व एक्झीबिशन सेंटर्स' निर्मिती चा कालबध्द कार्यक्रम निश्चित केला असुन २०२२ मध्ये नाशिक, नागपुर, लातुर, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व २०२३ मध्ये जळगांव, कोल्हापूर, सोलापूर, गडचिरोली, अकोला, जालना या जिल्ह्यात केंद्रांचा प्रारंभ केला जाईल. उर्वरीत सर्व जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने २०२७ या चेंबरच्या शताब्दि वर्षापर्यंत ही योजना पुर्ण करण्यात येईल.

महाराष्ट्र चेंबरच्या अंतर्गत राज्यस्तरीय महिला विभागाबरोबरच चेंबरच्या सहा विभागात विभागीय महिला समिति कार्यान्वित केल्या जातील.

वेगवेगळ्या क्षेत्रात बऱ्याच व्यवसायाच्या नवनवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत भारतीय अर्थव्यवस्था ही मागणी आणि पुरवठ्यावर अवलंबून आहे. आता लोकांच्या स्वदेशी वस्तू वापरण्याकडे कल वाढत चालला आहे .त्यामुळे व्यापार वाढवणे किंवा नवनवीन व्यापार सुरू करणे गरजेचे झाले आहे कामासोबतच शारीरिक व मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे सुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे म्हणून महिला खेळ, योग विविध प्रकारचे व्यायाम अशी क्षेत्रही कारकीर्द म्हणून निवडू शकतात .

छोट्या आणि मध्यम उद्योगाबरोबर मोठ्या उद्योगासाठी ही वृद्धीच्या अमर्याद संधी आता उपलब्ध होत आहेत .खाद्यपदार्थाच्या व्यवसायात अनेक महिला प्रभावीपणे कार्यरत आहेत त्याचप्रमाणे इतरही क्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमटविणे अपेक्षित आहे .जसे की माहिती व तंत्रज्ञान, शेती संबंधित उत्पादने, अभियांत्रिकी, सेवाक्षेत्र, विविध कला या सर्व क्षेत्रात महिला पाय रोवून उभे आहेत मात्र तुलनेने त्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. ते वाढविण्यासाठी वेगळा विचार किंवा दृष्टिकोन ठेवून व्यवसाय केला पाहिजे व त्याचबरोबर महिलांनी आपल्या जोखीम करण्याच्या क्षमतेत वाढ केली पाहिजे. जसे मेहनतीशिवाय पर्याय नसतो तसेच जोखीम घेतल्याशिवाय ही व्यवसायाची सुरुवात होत नाही. अन्नप्रक्रिया, वनौषधी वनस्पती लागवड, मार्केटिंग सेवा, हस्तकलेच्या वस्तू, आभासी सहाय्यक (Vertual ssistant) इव्हेंट मॅनेजमेंट, फोटोग्राफी, वेडिंग प्लानर, बांबू प्रोडक्स तसेच भारतातील टेक्स्टाईल इंडस्ट्रीशी संबंधित सर्व प्रोडक्सला आपल्या व बाहेरच्या देशात खूप मागणी आहे. यातही तुम्ही एक्सपोर्ट बिझनेस करू शकतात. गारमेंट क्लस्टर, फुड क्लस्टर तसेच ई-कॉमर्स अशा अनेक क्षेत्रात आपण व्यवसाय व व्यापार सुरू करू शकतो.

भांडवलाची कमतरता असल्यामुळे ही बर्याच महिला स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकत नाही परंतु त्यावर उपाय म्हणून विविध शासकीय योजना बँक यांच्या सहाय्य मिळते विविध प्रकारच्या अनुदानित शासकीय योजना महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या आहेत

१. **महिला उद्योजकांसाठी स्त्री शक्ती पॅकेज -** हे लहान व्यवसायात बहुसंख्य मालकी (५० टक्क्यांहून अधिक) स्त्रियांना दिले जाते. महिलांना त्यांच्या संबंधित राज्य एजन्सीद्वारे आयोजित उद्योजकता विकास कार्यक्रम (ईडीपी) मध्ये नामांकन करण्याची गरज आहे. या योजनेअंतर्गत २ लाखांपेक्षा जास्त कर्जावरील ०.०५ टक्के व्याज सवलत मिळू शकते.

२. **भारतीय महिला व्यवसाय बँक कर्ज योजना** - या योजनेमध्ये उत्पादन उपक्रमांच्या महिला व्यावसायिक मालकांसाठी २० कोटी रुपयांचा कर्जाचा समावेश आहे. सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट अंतर्गत, १ कोटी रुपयांपर्यंत कर्जासाठी तारण करण्याची गरज नाही व कर्ज परतफेड कालावधी ७ वर्ष आहे.

३. **देना शक्ती योजना** - शेती, उत्पादन, सूक्ष्म पत, किरकोळ मालाची दुकाने किंवा तत्सम लघु उद्योगांमध्ये महिला उद्योजकांसाठी ही योजना रुपये ५० हजार ते २० लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देते. व्याज दरात ०.२५ टक्के सवलत.

४. **उद्योगिनी योजना -** १८ ते ४५ वयोगटातील महिला उद्योजक, शेती, किरकोळ आणि अशा प्रकारच्या लघु उद्योगा करणाऱ्यांसाठी योजनेअंतर्गत १ लाख रुपयांपर्यंत कर्जाची सोय केली गेलेली आहे. योजनेच्या लाभासाठी संबंधित महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ४५,००० रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच, विधवा, निराधार किंवा अक्षम महिलांसाठी कोणतीही उत्पन्न मर्यादा ठरवण्यात आलेली नाही. अनुसूचित जाति जमातींमधील विधवा, निराधार किंवा अपंग महिलांसाठी, कर्जाच्या ३० टक्के अनुदान दिले जाते जे १०,००० रूपये पर्यंत असू शकते.

५. **सेंट कल्याणी योजना** - सेंट्रल बँक ऑफ इंडियाने उपलब्ध करून दिलेली ही योजना महिला व्यवसाय मालकांसाठी शेती कार्य किंवा किरकोळ व्यापार यासारख्या कामासाठी तयार करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत १ कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज मंजूर केले जाऊ शकते. त्यासाठी कुठल्याही प्रकारचे तारण किंवा गॅरंटरची आवश्यकता नाही.

६. **मुद्रा योजना** - ब्युटी पार्लर, ट्यूशन सेंटर, टेलिरिंग युनिट इत्यादीसारख्या लहान उद्योगाची सुरुवात करणार्या महिलांसाठी ही सामान्य सरकारी योजना लागू आहे. या योजनेअंतर्गत ५०,००० रुपयांपासून ५० लाख रुपयांपर्यंत कर्ज मंजूर केले जाऊ शकते. ह्यात कर्जाची रक्कम १० लाखांपेक्षा जास्त असेल तरच तारण आणि गॅरंटरची आवश्यकता असते. या योजने अंतर्गत तीन योजना आहेत: शिशु योजना (नवीन व्यवसायांसाठी ५०,००० पर्यंत कर्ज), किशोर योजना (५०,००० ते ५ लाखांमधील चांगल्या संस्थांसाठी कर्ज), तरूण योजना ( ५ लाख ते १० लाख रुपयांदरम्यान कर्ज व्यवसाय विस्तारासाठी).

७. **ट्रेड (व्यापार संबंधित उद्योजकता सहाय्य आणि विकास) योजना -** या योजनेचा उद्देश स्त्रियांनी चालवलेल्या प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, विशिष्ट प्रशिक्षण व सल्ला देणे आणि त्यासंबंधित गरजा पूर्ण करणे असा आहे. ह्यासाठी महिलांना कर्ज देणाऱ्या संस्थांना त्यांनी कोट केलेल्या (मूल्यांकित केलेल्या) एकूण प्रकल्प खर्चाच्या ३० टक्के पर्यंत रक्कम सरकारकडून अनुदान म्हणून दिली जाते. इतर ७० टक्के वित्तपुरवठा संस्थेकडून केला जातो.

८. **महिला उद्योग निधी योजना** - स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (एसआयडीबीआय) द्वारा सुरू झालेली ही योजना नवीन लघुउद्योग स्थापित करण्यासाठी १० लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य प्रदान करते. ह्या योजने अंतर्गत विद्यमान प्रकल्पांचे उन्नतीकरण आणि आधुनिकीकरण करण्यासाठी देखील मदत केली जाते. कर्जाची परतफेड १० वर्षांत करावी लागते आणि यात पाच वर्षांचा अधिस्थगन कालावधी देखील असतो.

९. **अन्नपूर्णा योजना** - ही योजना स्टेट बँक ऑफ म्हैसूर कडून पुरविण्यात आलेली आहे. ज्या महिलांचा पॅक केलेले जेवण, स्नॅक्स इत्यादी विकणे अशा प्रकारचा उद्योग आहे त्यांना या योजने अंतर्गत व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी काही रक्कम कर्ज म्हणून मंजूर केली जाते. त्यात जागा, स्वयंपाकघरात वापरले जाणार्या वस्तु, साधने व उपकरणे ह्यांची खरेदी ह्या सारख्या गोष्टींचा समावेश आहे. या कर्जासाठी तारण सुरक्षा म्हणून संबंधित मालमत्तेच्या मालकीसह गॅरंटर आवश्यक आहे. याशिवाय दिली जाणारी जास्तीत जास्त रक्कम ५०,००० आहे. ही रक्कम ३६ महिन्यांत सुलभ मासिक हप्त्यामध्ये भरणे आवश्यक आहे, तथापि, कर्ज मंजूर झाल्यानंतर, कर्जावर पहिल्या महिन्यासाठी ईएमआय भरावा लागणार नाही.

औद्योगिक विकासासाठी राज्यात तयार करण्यात आलेल्या पोषक वातावरणाचा लाभ महिला उद्योजकांना मिळावा आणि त्यातून महिला उद्योजकतेला प्रोत्साहन मिळावे यासाठी विशेष धोरण राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे या माध्यमातून महिलांना नावीन्यपूर्ण संधी उपलब्ध करून दिली आहे.

महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठीच्या अशा योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रभावीपणे होणे व महिलांना प्रत्यक्ष त्याचा लाभ मिळणे हे ही तितकेच महत्वाचे आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री ने यासाठी **'महिला उद्‌योजकता समिती'** स्वतंत्रपणे क्रियान्वित केली असुन विभागीय स्तरावरील समित्या व राज्यस्तरीय समिति च्या माध्यमातुन महिलांच्या विकासासाठी व सहाय्यासाठी अत्यंत प्रभावी यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

आता गरज आहे महिलांनी पुढाकार घेऊन विविध क्षेत्रात **BOSS** होण्याची, महाराष्ट्र चेंबर आपल्यासोबत आहेच...

# 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' चा ''राष्ट्रीय व्यापार शिरोमणी पुरस्कार'' ललित गांधी यांना

## केंद्रीय मंत्री स्मृती ईराणी यांच्या हस्ते प्रदान




कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स चा 'राष्ट्रीय व्यापार शिरोमणी पुरस्कार' केंद्रीय मंत्री स्मृती ईराणी यांच्या हस्ते स्विकारताना ललित गांधी, सोबत बी.सी.भरतीया, प्रवीण खंडेलवाल, सौ. जया गांधी, मुक्ती गांधी.

**नवी दिल्ली** : भारतातील ८ कोटी व्यापाऱ्यांची शिखर संस्था असलेल्या 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' (कॅट) या संस्थेचा 'राष्ट्रीय व्यापार शिरोमणी पुरस्कार' महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर के अध्यक्ष ललित गांधी यांना प्रदान करण्यात आला.

कॉन्फेडरेशन च्या राष्ट्रीय कार्यकारीणी बैठक प्रसंगी नवी दिल्ली येथे केंद्रीय महिला व बाल कल्याण मंत्री श्रीमती स्मृती ईराणी यांच्या हस्ते शानदार समारोहात पुरस्कार वितरण करण्यात आले. यावेळी कॉन्फेडरेशन चे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतीया, राष्ट्रीय महामंत्री प्रवीण खंडेलवाल, सौ. जया गांधी, कु. मुक्ति गांधी व्यासपीठावर उपस्थित होते.

व्यापारी, उद्योजकांची संघटनात्मक बांधणी, व्यापारी उद्योजकांच्या संरक्षणासाठी व न्याय हक्कासाठी विविध लढ्यांचे व आंदोलनाचे केलेले यशस्वी नेतृत्व, स्थानिक पातळीपासुन राज्य व राष्ट्रीय पातळीपर्यंत व्यापाऱ्यांच्या प्रश्नांसाठी केलेला संघर्ष व पाठपुरावा या क्षेत्रातील गेल्या ३५ वर्षातील केलेले उल्लेखनीय कार्य, विशेषतः कोरोना काळात लॉकडाउन मधील व्यापाऱ्यांच्या हक्कासाठी दिलेला आक्रमक लढा याची दखल घेउन त्यांची या पुरस्कारासाठी निवड केल्याचे राष्ट्रीय महामंत्री प्रवीण खंडेलवाल यांनी नमुद केले.

सदर समारंभाप्रसंगी कॅट चे राष्ट्रीय चेअरमन महेंद्र शहा, सचिन निवंगुणे, वरिष्ठ उपाध्यक्ष बृजमोहन अगरवाल, राष्ट्रीय उपाध्यक्ष धैर्यशील पाटील, कॅट चे महाराष्ट्राचे अध्यक्ष राजेंद्र बाठीया, कार्याध्यक्ष दिलीप कुंभोजकर, यांच्यासह देशभरातील सर्व राज्यांचे प्रमुख व व्यापारी नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना ललित गांधी यांनी कॉन्फेडरेशनने या पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल आभार व्यक्त करून हा पुरस्कार हा सर्व सहकाऱ्यांच्या सामुहीक प्रयत्नांमुळे मिळाला असल्याचे त्यांच्या वतीने स्विकारत असल्याचे नमुद करून देशभरातील व्यापारी, उद्योजकांना हा पुरस्कार समर्पित करत असल्याचे सांगितले व आयुष्याच्या अखेरपर्यंत व्यापारी व उद्योजकांच्या विकासासाठी कार्यरत राहु असे अभिवचन दिले.

◆◆◆

# सुर्यदत्ता इन्स्टिट्युट चा 'लाईफ टाईम अचिव्हमेंट ॲवॉर्ड -२०२२' ललित गांधी यांना समारंभपूर्वक प्रदान

## कर्नाटक चे राज्यपाल नाम. थावरचंदजी गहलोत यांच्या हस्ते पुरस्कार




**सुर्यदत्ता इन्स्टिट्युट चा 'लाईफ टाईम अचिव्हमेंट ॲवॉर्ड -२०२२' ललित गांधी यांना समारंभपूर्वक प्रदान करताना कर्नाटक चे राज्यपाल महामहिम थावरचंदजी गेहलोत, सुर्यदत्ता चे चेअरमन संजय चोरडीया**

सुर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटस तर्फे दिला जाणारा राष्ट्रीय लाईफ टाईम अचिव्हमेंट ॲवॉर्ड - २०२२, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर अध्यक्ष ललित गांधी यांना प्रदान करण्यात आला.

कर्नाटक चे राज्यपाल महामहिम थावरचंदजी गेहलोत यांच्या हस्ते हा पुरस्कार सुर्यदत्ता इन्स्टिट्युट च्या पुणे येथील प्रांगणात आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आला.

अहिंसा विश्व भारती चे लोकेश मुनि, सुर्यदत्ता चे चेअरमन संजय चोरडीया व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न झाला.

सुर्यदत्ता ग्रुप तर्फे समाजातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध मान्यवरांना गेली २० वर्षे हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. पुरस्काराचे हे २० वे वर्ष होते.

या कार्यक्रमाला प्रसिध्द भजन गायक अनुप जलोटा यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यापुर्वी हा पुरस्कार भारत रत्न भिमसेन जोशी, डॉ. कस्तुरीरंगन, डॉ. एम.एस.स्वामीनाथन, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. आर.ए.माशेलकर, डॉ. वसंत गोवारीकर, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, सुभाष रूणवाल, किरण बेदी तसेच अनेक पद्म भुषण पुरस्कार प्राप्त मान्यवरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

ललित गांधी यांनी शैक्षणिक, सामाजिक, कॅन्सर नियंत्रण, अपंग पुनर्वसन, व्यापार-उद्योग संघटन अशा विविध क्षेत्रात गेली ३५ वर्षे केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# महाराष्ट्र चेंबर च्या संगीता पाटील यांना जागतिक महिला दिनानिमित्त राष्ट्रीय विशिष्ट महिलारत्न पुरस्कार प्रदान



**कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स चा 'राष्ट्रीय महिला रत्न पुरस्कार' केंद्रीय मंत्री स्मृती ईराणी यांच्या हस्ते स्विकारताना संगीता पाटील.**

कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT)' चा 'विशिष्ट महिला रत्न सन्मान अवॉर्ड केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री श्रीमती स्मृती इराणी यांच्या हस्ते चेंबरच्या महिला उद्यमीता समितिच्या को-चेअरमन श्रीमती संगीता पाटील यांना महिला दिनाचे औचित्य साधुन ली-मेरिडियन हॉटेल, दिल्ली येथे प्रदान करण्यात आला.याप्रसंगी व्यासपीठावर केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री श्रीमती स्मृती इराणी, कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे राष्ट्रीय महामंत्री प्रवीण खंडेलवाल, राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया, चेअरमन महेंद्र शाह उपस्थित होते. राष्ट्रीय संगठन मंत्री ललित गांधी आभासी पध्दतीने सहभागी होते.'

कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' द्वारे भारतातील महिलांना उन्नत करण्यासाठी, त्यांचा विकास आणि औद्योगिकतेला वाढवण्यासाठी आणि प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या महिला सशक्तिकरण कार्यक्रमाला पुढे नेण्यासाठी असाधारण व उल्लेखनीय कार्य करणार्यांना विशिष्ट महिला रत्न सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येतो.संपूर्ण देशभरातून एकूण १६ महिलांची या सन्मान पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. त्यामध्ये महाराष्ट्रातील महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारिणी सदस्या श्रीमती संगीता पाटील यांची विशिष्ट महिला रत्न सन्मान पुरस्कारासाठी निवड झाली.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी श्रीमती संगीता पाटील यांचे या पुरस्कारासाठी विशेष अभिनंदन केले. महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्यमीता समिति च्या उपाध्यक्षा या नात्याने त्यांच्या चेंबरच्या महिला धोरण ठरविण्यामध्ये महत्वाचा सहभाग आहे. केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री स्मृती ईराणी यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारणे हा जीवनातील सर्वोच्च महत्वाचा क्षण असल्याचे सांगुन संगिता पाटील यांनी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रोत्साहनामुळे हे यश मिळवता आल्याचे नमूद केले.

## स्वागत आहे एक्सपर्ट कमिटीच्या नवीन पदाधिकाऱ्यांचे...



**श्री. घनश्याम गोयल**
चेअरमन,
सी.एस.आर समिति



**श्री. सचिन मेनन**
को-चेअरमन,
सी.एस.आर समिति



**श्री. प्रकाश कानुगो**
को-चेअरमन,
सी.एस.आर समिति



**श्री. प्रदिप मांजरेकर**
चेअरमन,
इंटरनल ट्रेड कमिटी



**श्री. उदय गोडबोले**
चेअरमन,
टॅक्सेशन कमिटी

# राज्यातील विमानसेवांचा कालबद्ध विकास केला जाईल - दिपक कपूर

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स बरोबर संयुक्त बैठक संपन्न

## विमानतळांसाठी महाराष्ट्र सरकार मोठा निधी देणार



**महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे व्हाईस चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक दिपक कपूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत बोलताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी, सौ शुभांगी तिरोडकर, रवींद्र माणगवे, सुधाकर देशमुख, चंद्रशेखर पुनाळेकर, सुनीत कोठारी, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे.**

राज्यातील विमानतळांच्या समस्या सोडविणे व विकास करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने निवेदनाद्वारे केलेल्या सुचनाबाबतही सकारात्मक विचार करून अंमलबजावणी करण्यात येईल व राज्यातील विमानसेवांचा कालबद्ध विकास केला जाईल अशी ग्वाही महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे व्हाईस चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक दिपक कपूर यांनी दिली.

महाराष्ट्र राज्यातील विविध शहरांतील विमानतळांचा विकास व नवीन सेवा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी चे व्हाईस चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक दिपक कपूर यांच्या समवेत वर्ल्ड ट्रेड सेन्टर मधील कार्यलयात झालेल्या संयुक्त बैठकित सहभाग घेतला.

याप्रसंगी प्रास्तविक करताना विमानतळांच्या समस्या सोडविणे व विकास करणे यासाठी महाराष्ट्र चेंबरची सिविल एव्हिएशन समिती संपूर्ण सहयोग असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्यातील विमानतळांच्या विकासासाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे व्हाईस चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक दिपक कपूर यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

चर्चेप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रामुख्याने कोल्हापूर, उत्तर महाराष्ट्र, कोकण , विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र या विभागातील शेतमालाला प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय माल वाहतूक विमानसेवा सुरू करण्याची मागणी केली. कोल्हापूर विमानतळाचे विस्तारीकरण गतीने पूर्ण करण्याची मागणी केली.

औरंगाबाद विमानतळावरून नवीन रूट सुरू करणे, जळगाव विमानतळावरून विमान सेवा वाढवून मालवाहतूक सेवा सुरु करणे, नाशिक विमानतळावरील सुविधा वाढवणे अश्या विविध मागण्याचा अभ्यास अहवाल सादर करून झपाट्याने वाढणाऱ्या प्रवासी व माल वाहतुकीकरिता जिल्हास्तरावर विमानतळ विकास प्राधिकरण व महाराष्ट्र चेंबरच्या

# बैठकीतील महत्त्वपूर्ण घोषणा



- कोल्हापूर विमानतळासाठी लागणारा निधी महाराष्ट्र सरकार कडून मंजूर केला जाणार.
- रत्नागिरी विमानतळासाठी लागणारा निधी महाराष्ट्र सरकार कडून मंजूर केला जाणार आहे.
- शिर्डी येथे स्वतंत्र कार्गो टर्मिनल उभारणार.
- अमरावती येथील विमानतळासाठी भारत सरकारकडून ५२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून पहिल्या टप्प्यातल्या ६.५ कोटी रुपये मिळाले आहेत. तसेच अमरावती विमानतळासाठी महाराष्ट्र सरकारकडून अतिरिक्त २३ कोटी मिळणार. असल्याचे दिपक कपूर यांनी सांगितले.
- नोव्हेंबर २०२२ पासून अमरावती विमानतळावरून प्रवासी विमानसेवा सुरु करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत जाहीर करण्यात आला.
- पुणे शिर्डी नागपूर विमान सेवा १८ फेब्रुवारी २०२२ पासून अलाइन्स एअर सुरु करणार.
- पुणे औरंगाबाद नागपूर सेवा १ मार्च पासून सुरू होणार.



दिपक कपूर याना मानचिन्ह देऊन सत्कार करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी, सौ शुभांगी तिरोडकर, रवींद्र माणगवे, सुधाकर देशमुख, चंद्रशेखर पुनाळेकर, सुनीत कोठारी, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे.

संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण केंद्र उभारून युवकांना विमानसेवेशी निगडित रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगितले.

राज्यातील जिल्ह्यांना शहरासाठी जोडण्यासाठी नवीन हवाई मार्ग व विमानसेवा सुरू करण्याच्या सूचना वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी यांनी केली. चेंबरच्या सिविल एव्हिएशन समितीचे सुनीत कोठारी यांनी या प्रसंगी विमान सेवा पुरवणाऱ्या कंपनीच्या इंधनाचा मूल्य वर्धित करा मध्ये कपात करून तो १ टक्के करावा असे सुचविले.

याप्रसंगी दिपक कपूर यांनी विमानतळ विकास प्राधिकरनाच्या विविध विकास कामांची माहिती दिली. त्यात प्रामुख्याने कोल्हापूर विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरनासाठी केलेले प्रयत्न व महाराष्ट्र सरकारने केलेल्या अर्थसहायातून येणाऱ्या तीन ते चार महिन्यात कोल्हापूर विमानतळ विस्तारीकरणासाठी ६४ हेक्टर जमिनीचे भूसंपादन पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती शिष्टमंडळाला दिली. विमानतळ प्राधिकरण हे लवकरच अमरावती आणि रत्नागिरी या जिल्ह्यातील विमानतळाच्या विकास कामाला सुरुवात करणार असून नोव्हेंबर २०२२ ला अमरावती विमानतळावरून पहिले उड्डाण करण्याचे उद्धिष्ट असल्याचे दीपक कपूर यांनी सांगितले.

विमानसेवा विस्तारीकरणासाठी सर्व विमान कंपनी व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स बरोबर येत्या महिन्यात बैठक घेण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरनाने सुरू केलेल्या शिर्डी व नागपूर मालवाहतूक सेवेला मिळणारा प्रतिसाद व तेथील शेतकऱ्यांना होणारा फायदा याची सविस्तर माहिती दिली.

शिष्टमंडळात विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी, उपाध्यक्ष सौ शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष रवींद्र माणगवे, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुनाळेकर, सुनीत कोठारी, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे होते.

# औद्योगिक वीज दर अनुदान स्थगितीस महाराष्ट्र चेंबरचा तीव्र विरोध - ललित गांधी

## औद्योगिक वीज दर अनुदान स्थगिती परिपत्रक रद्द न केल्यास आंदोलनाचा इशारा

**मुंबई** : महावितरण ने १ मार्च २०२२ रोजी विजेचे अनुदान स्थगित करण्याच्या काढलेल्या परिपत्रकास महाराष्ट्र चेंबरने तीव्र विरोध दर्शविला असून परिपत्रक रद्द न झाल्यास औद्योगिक क्षेत्रात मोठा असंतोष निर्माण होईल. त्यासाठी सरकारने हे परिपत्रक रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र सरकारच्या ऊर्जा विभागाने काढलेल्या परिपत्रकात विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, वस्त्रोद्योग, यंत्रमाग उद्योग तसेच डी आणि डी प्लस झोनमध्ये असलेल्या उद्योगांचे अनुदान स्थगित करण्यात आल्याचे म्हटले आहे.

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वीजेचे दर जास्त असून त्याचा परिणाम इतर राज्याच्या उद्योगांशी स्पर्धा करतांना अडचणीचा ठरतो. गेल्या दोन वर्षांपासून करोनामुळे अडचणीत आलेला उद्योजक आपला उद्योग सुरळीत करण्याचा प्रयत्न करत असताना अशा प्रकारचे परिपत्रक काढून वीज अनुदान बंद करणे म्हणजे राज्यातील उद्योग बंद करणे अथवा शेजारील राज्यात उद्योग स्थलांतरित करण्यास भाग पाडत असल्याचे मत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मांडले.

देशाच्या व राज्याच्या आर्थिक विकासात उद्योगांचा मोठा वाटा असून उत्पादन व निर्यातीत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे परंतु गेल्या काही वर्षांपासून राज्याच्या औद्योगिक विकासाची परिस्थिती खालावली असून त्यास प्रामुख्याने सरकारने घेतलेले निर्णय कारणीभूत ठरत असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी नमूद केले आहे.

सद्यस्थितीत राज्यातील उद्योग कठीण परिस्थितीतून जात असून उद्योग सुरू ठेवणे अवघड झाले आहे. सरकारच्या उद्योगाविषयीच्या धोरणांबाबत उद्योजकांमध्ये नाराजी आहे. महाराष्ट्र राज्याची प्रतिमा उदयोन्मुख- असून अशा घातक निर्णयामुळे जागतिक व देश पातळीवर राज्याची प्रतिमा नकारात्मक होऊन त्याचा परिणाम राज्याच्या आर्थिक विकासावर होईल असे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

महाराष्ट्र सरकारने हे परिपत्रक त्वरित रद्द न केल्यास महाराष्ट्र चेंबर व चेंबर शी संलग्न औद्योगिक संघटना राज्यपातळीवर आंदोलन करतील असा इशारा अध्यक्ष ललित गांधी यांनी दिला आहे.

## स्वागत आहे एक्सपर्ट कमिटीच्या नवीन पदाधिकाऱ्यांचे...



**श्री. चेतन नरके**
को-चेअरमन,
इंटरनॅशनल रिलेशन्स



**श्री. दीपक कोकाटे**
को-चेअरमन,
ऊर्जा समिती



**श्री. सी. एस. सिंग**
को-चेअरमन, बंदरे विकास
आणि लॉजिस्टिक समिती



**सौ. प्रविना ओसवाल**
को-चेअरपर्सन,
उद्योजकता विकास समिती



**सौ. कविता देशमुख**
को-चेअरपर्सन,
महिला उद्योजकता समिती

# महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा भव्य नागरी सत्कार

## केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड व केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते सन्मान



**ललित गांधी यांचा सत्कार करताना केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड व केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे सोबत विरेंद्रकुमार धोका, सुभाष देवदान, उमेश पंचारीया आदी.**

'महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड व कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचा 'राष्ट्रीय व्यापार शिरोमणी पुरस्कार' श्री. ललित गांधी यांना मिळाल्याबद्दल महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलन, महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी युवा मंच जालना नागरी सत्कार समितीतर्फे केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड व केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते ललित गांधी यांचा भव्य नागरी सत्कार शनिवार दिनांक ५ मार्च २०२२ रोजी रुक्मिणी मंगल कार्यालय जालना येथे करण्यात आला.

याप्रसंगी व्यासपीठावर विरेंद्र धोका, सुभाष देवीदान, उमेश पंचारिया व मान्यवर उपस्थित होते.

◆◆◆

# रोटरी, पुणे गांधीभवन च्या व्होकेशनल ॲवॉर्डस् चे वितरण महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते संपन्न



**रोटरी पुणे गांधीभवन च्या व्होकेशनल ॲवार्ड चे वितरण संदिप नुलकर, शिल्पा व्यापारी, यतिन तांबे यांना प्रदान करताना ललित गांधी**

# जालना येथे केंद्रीय अर्थसंकल्प २०२२ या विषयावर परिसंवादाचे आयोजन




**चर्चासत्रास मार्गदर्शन करताना ललित गांधी व्यासपीठावर रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, अर्थराज्यमंत्री भागवत कराड.**

महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलन, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ऍण्ड ऍग्रिकल्चर व महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय अर्थसंकल्प २०२२ या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, कलश ग्रुपचे अध्यक्ष सुरेश झुणझुणवाला, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय अर्थमंत्री अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, कृषी उद्योग डीलर्स असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री, मारवाडी संमेलनाचे जालना जिल्हा अध्यक्ष सुभाष देवीदान, घनश्याम गोयल, उमेश पंचारिया, नितीन तोतला उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सुरुवातीला व्यापार-उद्योगासमोरील आव्हाने याविषयावर मार्गदर्शन केले. व्यापारी उद्योजकांची पुढची पिढी व्यापार-उद्योगात येण्यास तयार नाही याची कारणमीमांसा केली तसेच व्यापारी उद्योजकांनी बदलत्या काळानुसार नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून मार्केटिंगची पद्धत अवलंबून व्यापार-उद्योग करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. केंद्र सरकारने व्यापारी उद्योजकांना त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना केले

केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांनी अर्थसंकल्पाचे विश्लेषण केले तसेच देश आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात अनेक बाबींची तरतूद करण्यात आली असून सर्व क्षेत्राला चालना देणारा अर्थसंकल्प असल्याचे सांगितले यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा covid-19 महामारी समोर ठेवून तयार करण्यात आला आहे देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव असल्याने या केंद्रीय अर्थसंकल्पाला अमृत काल का बजेट म्हणून संबोधले गेले आहे. देशाच्या पुढील पंचवीस वर्षाचा विचार करून हा केंद्रीय अर्थसंकल्प तयार करण्यात आला असल्याचे डॉ. कराड म्हणाले. तसेच अर्थसंकल्पातील विविध विभागांचा सविस्तर आढावा घेऊन त्यातील बारकावे समजावून सांगितले.

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी सांगितले की यंदाच्या अर्थसंकल्पात राज्याला रेल्वेसाठी ११ हजार कोटींची तरतूद केली आहे यामधून मनमाड ते परभणी दुहेरीकरण आणि विद्युतीकरण जालना तिकीट लाईन यासह अन्य रेल्वेच्या सुविधा देण्यात येणार असल्याचे सांगितले.





महाराष्ट्र चेंबर तर्फे नाम. भागवत कराड व नाम. रावसाहेब दानवे यांना निवेदन देताना अध्यक्ष ललित गांधी.

पूर्वी रेल्वे विभागात काहीही काम करायचे असल्यास मंजूर केंद्राकडून मंजुरी घ्यावी लागत मात्र आता स्थानिक स्तरावर काही कामे मंजुरी न घेता करता येऊ शकतात असे प्रयोजन करण्यात आले आहे त्यामुळे रेल्वे संबंधित सर्व कामे वेळेत पूर्ण होतील असे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी सांगितले.

चार्ट अकाउंटंट संघटनेचे अध्यक्ष दर्शन जैन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन तोतला यांनी केले कार्यक्रमास गोविंद प्रसाद मुंदडा, गोपाल मानधने, सुनील राठी, महावीर जांगिड, अतुल लढा, भास्कर दानवे, विजय जैन मनीष तवरावाला, सगीर अहमद, राजेश राऊत आदींसह उद्योजक व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्याच्या अर्थसंकल्पाचे स्वागत - ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबरच्या विमानतळ, कर अभय योजना विषयीच्या मागण्या मान्य झाल्याने समाधान



अर्थसंकल्प अवलोकनासाठी विधानसभेत उपस्थित राहिल्यानंतर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रभारी अध्यक्ष नरहरी झिरवाळ यांना स्मृतिचिन्ह प्रदान केले. त्याप्रसंगी आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे.

**मुंबई** : महाराष्ट्र सरकारने आज विधिमंडळात अर्थसंकल्प सादर केला त्यामध्ये अर्थमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्या वेगवेगळ्या घोषणा केल्या त्यामध्ये प्राधान्याने महाराष्ट्रातील युवकांना स्टास्टार्टअप कडे प्रोत्साहित करण्यासाठी प्रत्येक महसूल विभागांमध्ये अत्याधुनिक इंक्युबेशन सेंटर करण्याची घोषणा केली व त्याकरीता साडेपाचशे कोटी रुपयांची तरतूद सरकारने केली व कौशल्य विकासासाठी तीस कोटी रुपयांची तरतूद या दोन्ही तरतुदी युवकांना व्यापार उद्योग करण्यास प्रोत्साहित करणाऱ्या आहेत. स्टार्टअपला लागणाऱ्या बीज भांडवलासाठी राज्य सरकारनं सुरुवातीच्या टप्प्यात शंभर कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्याची घोषणा केली आहे याचेही 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' तर्फे अध्यक्ष ललित गांधी यांनी स्वागत केले आहे.

दिंडोरी येथे आदिवासी व उद्योजकांकरीता औद्योगिक क्लस्टर निर्माण करण्याची घोषणा हि ग्रामीण भागातील आदिवासी व मागासवर्गीय तरुणांना व्यापार व उद्योग करण्यास प्रोत्साहित करेल.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' तर्फे सातत्याने जीएसटी, व्हॅट, विक्री इत्यादी करांच्या बाबत असलेल्या त्रुटी व व्यापारी उद्योजकांवर असलेले प्रलंबित प्रकरणे यावर सरकारने अभय योजना जाहीर करावी हि मागणी केली होती. आज सरकारने ती अभय योजना जाहीर केल्याबद्दल राज्य सरकारचे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अध्यक्ष ललित गांधी यांनी अभिनंदन केले.

महाराष्ट्र चेंबरने सरकारकडे वेगवेगळ्या विमानतळांना निधी उपलब्ध करून देण्याची मागणी सातत्याने केली होती. आजच्या अधिवेशनामध्ये विमानतळांसाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला असून त्याचा फायदा शिर्डी, कोल्हापूर, अमरावती येथील विमानतळांच्या विस्तारीकरण व विविध सुविधा उपलब्ध करण्याकरीता होईल.

अर्थसंकल्पात अभय योजना, विमानतळांसाठी केलेली तरतूद, अत्याधुनिक इक्युबॅशन सेंटरकरीता केलेली तरतुद यांचा व्यापार उद्योग क्षेत्राला मोठ्या प्रमाणात फायदा होईल.

विधीमंडळाचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाचे प्रत्यक्ष अवलोकन करण्यासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ला विशेष आमंत्रित केले होते. या अर्थसंकल्पातील तरतुदी या व्यापार उद्योगाला मदतीच्या ठरतील व तरुणांना उद्योगासाठी प्रोत्साहित करतील असे मत अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केले.

# ऑनलाईन स्पर्धेसाठी तंत्रज्ञान आत्मसात करावे -ललित गांधी

## जालन्यातील कार्यक्रमात व्यापाऱ्यांना मार्गदर्शन



**जालना येथे एका कार्यक्रमात व्यापार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यावेळी उपस्थित महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या गव्हर्निंग कॉन्सिलचे नवनियुक्त सदस्य उद्योजक घनश्यामदास गोयल, द्वारकादास सोनी, महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी, कार्यकारी सचिव शाम लोढा, संजय दर्डा, विजय राठी आदी.**

**जालना / प्रतिनिधी :** व्यापारी वर्गाला ऑनलाईन मार्केटिंगशी स्पर्धा करायची असेल तर आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावेच लागेल. असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे नुतन अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. श्री. गांधी शनिवारी (दि.०५) जालना येथे आले असता त्यांनी व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या गव्हर्निंग कॉन्सिलचे नवनियुक्त सदस्य उद्योजक धनश्यामदास मोनल, द्वारकादास सोनी, महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी, कार्यकारी सचिव शाम लोया, संजय दर्डा, विजय राठी, अर्जुन मेस्त्री, व्यंकटलाल खंडेलवाल, सुभाष देवीदान, गोवर्धन अग्रवाल, दिलीप शहा आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना श्री. ललित गांधी म्हणाले की जीएसटी, इन्कम टॅक्स किंवा इतर कायद्यात असलेल्या किचकट तरतुदींमुळे व्यापार करणे दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे. हे किचकट कायदे व्यापारी वर्गासाठी सुरळीत करण्याचा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यमातून शासनाकडे प्रयत्न चालू आहे. ऑनलाईन मार्केटिंगशी स्पर्धा करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यमातून एक

### व्यापाऱ्यांच्या समस्या सोडण्यास कटिबध्द - घनश्यामदास गोयल

या कायक्रमात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या गव्हर्निंग कॉन्सिलवर निवड झाल्याबद्दल येथील उद्योजक घनश्यामदास गोयल. द्वारकादास सोनी यांचा चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सत्कार केला. यावेळी उद्योजक घनश्यामदास गोयल व द्वारकादास सोनी यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या सहकार्याने व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबध्द असल्याचे उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी सांगितले

ॲप विकसित करण्याचे काम चालू आहे. कुठलेही कमिशन न घेता या माध्यमातून सर्वसामान्य व्यापारी आपला माल जगात कुठेही विक्री करु शकेल. त्यासाठी सर्वच व्यापाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावेच लागेल. महाराष्ट्र सरकारने उद्योगासाठी वीजबिलावर असलेल्या सबसिडीला स्थगिती दिल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त करून ही स्थगिती न उठविल्यास आंदोलनाचा इशारा दिला. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या मार्गदर्शनाखाली जिल्हयातील सर्व सामान्य व्यापारी वर्गाच्या समस्या सोडवण्यात जिल्हा व्यापारी महासंघ कटिबध्द आहे. असे महासंघाचे अध्यक्ष विनित सहानी म्हणाले.

जिल्हा सहकार भारतीच्या अध्यक्षपदी हेमंत ठक्कर यांची निवड झाल्याबद्दल जिल्हा व्यापारी महासंघातर्फे त्यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. महासंघाच्या विजया बोरा यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन महासंघाचे कार्यकारी सचिव शाम लोढा यांनी केले या कार्यक्रमास महासंघाचे पदाधिकारी विनोद कुमावत, इदरचंद तवरावाला, विजयराज सुराणा, विजयकुमार बगाडिया, डॉ. संजय रुईखेडकर, प्रमोद मंडाल, ईश्वर बिल्होरे, नागेश बेनिवाल, विनोद पवार आदींची उपस्थिती होती.

◆◆◆

# महाराष्ट्र चेंबरतर्फे सर्व व्यापाऱ्यांना मोफत वेबसाईट उपलब्ध करुन देणार : ललित गांधी

## सिंधुदुर्ग जिल्हा व्यापारी मेळावा उत्साहात संपन्न

**कणकवली** : कोरोना काळापासून व्यापार अनेक संकटांचा सामना करत आहेत. त्यातच आता परदेशी कंपन्यांकडून ऑनलाईन व्यापाराचे आव्हान उभे राहिले आहे. हे ऑनलाईन खरेदी तंत्रज्ञान बंद करता येणार नाही. त्यासाठी व्यापाऱ्यांना तंत्रज्ञानाने अपडेट व्हावे लागेल. व्यापार उदीम वाढवण्यासाठी त्यांना डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याची गरज आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे व्यापारी महासंघाशी संलग्नित सिंधुदुर्गातील सर्व व्यापाऱ्यांना स्वतः ची वेबसाईट मोफत करुन दिली जाईल. जेणेकरून ते व्यापारी ग्राहकांच्या ऑनलाईन ऑर्डर स्वीकरु शकतील. तसेच चेंबरतर्फे आत्मनिर्भर पोर्टलही तयार केले जाईल. या ॲपच्या माध्यमातून आपापसात व्यापार वाढू शकेल, अशी घोषणा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यापारी एकता मेळाव्यात केली.




**व्यापारी मेळाव्याचे दीप प्रज्वलनाने उद्घाटन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. सोबत प्रसाद पारकर, समीर नलावडे, मनोज रावराणे, दीपक बेलवलकर, राजन पारकर आदी.**

सिंधुदुर्ग जिल्हा व्यापारी महासंघ आणि कणकवली तालुका व्यापारी संघाच्यावतीने ३४ वा व्यापारी एकता मेळावा सोमवारी कणकवली येथे आयोजित करण्यात आला होता.

◆◆◆

# राज्यात लवकरच ६ विभागात ॲग्रोबेस क्लस्टर व महिला क्लस्टर स्थापन करणार - ललित गांधी

## महाराष्ट्राला भारतातील पहिली ट्रिलियन अर्थव्यवस्था करण्याचे लक्ष




राज्यातील निर्यात वाढविण्यासाठी व जागतिक बाजारपेठेत संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने दक्षिण कोरिया, तैवान, आणि थायलंडमध्ये दौरे केले तसेच विविध देशातील आंतरराष्ट्रीय संघटना व चेंबर ऑफ कॉमर्सबरोबर २७ सामंजस्य करार केले आहेत. सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक व महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात सहा विभागात ६ ऍग्रोबेस क्लस्टर, महिला क्लस्टरची लवकरच स्थापना करून स्थानिक व्यापार उद्योगांना उत्पादनांची निर्यात करण्यासाठी चालना देण्यात येणार आहे. राज्यातील व्यापार-उद्योगांचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर कटिबद्ध असून महाराष्ट्राला भारतातील पहिली ट्रिलियन अर्थव्यवस्था करण्याचे लक्ष असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

भारत -लिमा (पेरू आणि बोलिव्हिया) दूतावास, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ऍग्रिकल्चर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि इंडिया-पेरू चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील गुंतवणूक वाढीसाठी गुरुवार दिनांक २७ जानेवारी २०२२ रोजी आभासी चर्चासत्र झाले.

याप्रसंगी पेरू आणि बोलिव्हियातील भारताचे राजदूत श्री. मंदारापु सुब्बारायुडू, महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी.अन्बलगन, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री ललित गांधी, फिक्कीचे संचालक श्री. गजेंद्र बडगुजर, इंडिया पेरू चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. रोहित राव यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्यामधील व्यापार व्यवसाय वाढावा, महाराष्ट्र राज्यात गुंतवणूक वाढावी, नवीन व्यापार उद्योग यावेत यासाठी गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र चेंबरने राज्यातील उद्योगांच्या वाढीसाठी स्पर्धात्मकता अधिक सुलभ करण्यासाठी उद्योग, धोरणकर्ते, बँक, वित्तीय संस्था आणि बहुपक्षीय एजन्सीसह विविध भागधारकांमधील चर्चा सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. तंत्रज्ञान अद्यावत करण्यापासून ते तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, नवीन युगातील विपणन ते नाविन्यपूर्ण वित्तपुरवठा मिळणे, उदयोगांची क्षमता वाढविण्याचे कार्य विविध

कार्यक्रमांद्वारे केले आहे.

भारत-लिमा (पेरू आणि बोलिव्हिया) व्यापार उद्योगांसाठी द्विपक्षीय करार झाला असून यामध्ये अनेक क्षेत्रांचा समावेश आहे. यामुळे निश्चितच व्यापार उद्योगांच्या अनेक नवीन संधी निर्माण होतील आणि व्यापारात भागीदारी निर्माण करण्यास मदत होईल. करोना महामारीमुळे जागतिक स्तरावर व्यवसायांवर मोठा परिणाम झाला असून आता परिस्थिती सामान्य होत आहे. महाराष्ट्र, पेरू आणि बोलिव्हियामध्ये व्यवसाय वृद्धीच्या संधी असून त्याचा फायदा निश्चित सर्वांना होईल अशी अपेक्षा महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केली.

पेरू आणि बोलिव्हियातील भारताचे राजदूत श्री. मंदारापु सुब्बारायुडू यांनी महाराष्ट्र, पेरू, बोलिव्हियामध्ये व्यापार, उद्योगांची व माहितीची देवाण घेवाण होऊन उपलब्ध संधीचा फायदा महाराष्ट्र, पेरू, बोलिव्हिया मध्ये व्यापारी, उद्योजक घेतील व दोन्ही देशात व्यापार व्यवसाय वाढेल गुंतवणूक होईल अशी आशा व्यक्त केली. महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी.अन्बलगन यांनी राज्यात महाराष्ट्र औद्योगिक महामंडळातर्फे देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली. तसेच राज्यात गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण असल्याचे सांगितले.

फिक्कीचे संचालक गजेंद्र बडगुजर यांनी चित्रफितीद्वारे अभियांत्रिकी वस्तू, वस्त्रोउद्योग आणि फार्मासिटिकल्स या क्षेत्रात असलेल्या विविध संधीची माहिती दिली.

इंडिया पेरू चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रोहित राव यांनी पेरू येथे असलेल्या व्यापार उद्योगांच्या संधीची माहिती दिली. महाराष्ट्र व पेरूमध्ये निश्चित व्यापार उद्योग वाढेल अशी खात्री असल्याचे सांगितले.

गॅब्रीया यांनी पेरू आणि बोलिव्हिया मध्ये व्यापार उद्योगांसाठी असलेल्या विविध संधीची सविस्तर माहिती चित्रफितीद्वारे दिली. चर्चासत्रास मनप्रीतसिंग, महाराष्ट्र चेंबरचे प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे, सचिव विनी दत्ता उपस्थित होते.


*With Best Compliments from*

**Mahendrakumar Patil** 7720050030

**Sachin Kute** 7720050033

**Virendrasing Patil** 7720050020

The Logistics company
[A Partnership Based on Trust]

**TGL Shipping Services Pvt. Ltd.**

**CUSTOM BROKER & INTERNATIONAL FREIGHT FORWARDER**



• OFFICE ADDRESS •

308, 3RD FLOOR, BUSINESS CENTER, KARMAYOGI NAGAR,
GOVIND NAGAR, NASHIK- 422 009, MAHARASHTRA-INDIA
Ph.No.: 0253-2951777/78, 7720050020/7720050030/7720050033
E-mail : mahendra@tglshipping.com / sachin@tglshipping.com / viru@tglshipping.com
Website : www.tglshipping.com

# जय आनंद ग्रुप, पुणे तर्फे प्रसिध्द उद्योजक प्रकाश धारीवाल यांना समाजभुषण पुरस्कार प्रदान

## प्रकाश धारीवाल यांचे उत्तुंग कार्य अनेकांना प्रेरणादायी - ललित गांधी





उद्योगपती प्रकाश धारीवाल यांना 'समाजभुषण पुरस्कार' वितरीत करताना विजयकांत कोठारी, ललित गांधी, विजय भंडारी, विजय चोरडीया, सोबत सौ. बिना धारीवाल.

# अभिनंदनीय निवड...




महाराष्ट्र चेंबरच्या गव्हर्निंग काऊन्सिल चे सदस्य सी.एस.सिंग यांची नाशिक कस्टम ब्रोकर असो. च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करणेत आला. याप्रसंगी उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, आशिष नहार, विजय वेदमुथा इ. मान्यवर.

# ।। अभय योजना ।।

## विक्रिकर विभागातील भांडणे मिटवण्याची संधी

राज्यशासनाने या वर्षाच्या अर्थसंकल्पात विक्रिकर विभागात येणारे सर्व कर कायदे व त्या निगडीत विषयांवरील जुने वाद- विवाद व तंटे मिटविण्यासाठी 'महाराष्ट्र सेटलमेंट ऑफ अरीअर्स ऑफ टॅक्स इट्रेंस्ट, पेन्लटी, ऑफ लेट फी अॅक्ट २०२२ अशी स्वतंत्र योजना काढली आहे. संपुर्ण तपशिलाची प्रतिक्षा आहे. ही योजना ३० जुन २०१७ पर्यंतच्या कालावधीसाठी जीएसटी कायदा लागू होण्यापूर्वी विक्रिकर विभागाद्वारे आकारण्यात आलेल्या करांवर लागू आहे. शासन जुन्या थकीत लवादांना निकाली काढण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे चालणारे तंटे कमी होतील. शासनाला महसुलही मिळेल व लवांदांवर होणारा शासनाचा खर्चही कमी होईल.

विवादित रक्कम म्हणजे नमुद केल्यानुसार शासकीय आदेश, नोटीस, असेसमेंट ऑर्डर, कार्यवाही इत्यादीनुसार कर, व्याज, दंड किंवा लेट फीच्या रूपाने असलेली देय बाकी. या योजनेचा लाभ घेण्यासाठी करदात्याने भरलेले अपील कुठलीही अट न ठेवता मागे घ्यावे लागेल. या योजनेचा फायदा घेण्यासाठी आवश्यक रक्कम भरण्याचा तक्ता सोबत दिला आहे. त्याद्वारे करदात्यांनी वेळीच निर्णय घ्यावा.

| तपशील | कर | | व्याज | | दंड | |
|---|---|---|---|---|---|---|
| थकबाकी | देय | सुट | देय | सुट | देय | सुट |
| १० हजार पर्यंत | 0% | १००% | 0% | १००% | 0% | १००% |
| १० हजार ते १० लाख | २०% | ८०% | २०% | ८०% | २०% | ८०% |
| १० लाख ते ५० लाख | ३०% | ७०% | १०% | ९०% | ०५% | ९५% |
| (३१ मार्च २००५ पर्यंत) | | | | | | |
| १० लाख ते ५० लाख | ३०% | ७०% | १०% | ९०% | ०५% | ९५% |
| (०१ एप्रिल २००५ ते ३० जुन १७) | ५०% | ५०% | १५% | ८५% | ०५% | ९५% |

## मराठवाडा विभागातुन उपाध्यक्षपदी तनसुख झांबड यांची निवड



**तनसुख झांबड,**
उपाध्यक्ष, मराठवाडा

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर' च्या मराठवाडा विभागातील रिक्त असलेल्या 'उपाध्यक्ष'पदी चेंबरचे कार्यकारीणी सदस्य, मराठवाडा व्यापारी असोसिएशनचे ज्येष्ठ नेते तनसुख झांबड यांची निवड करण्यात आली आहे. २४ मार्च २०२२ रोजी च्या गव्हर्निंग काऊन्सील बैठकीत व्यवस्थापन समितिच्या वतीने शिफारस करण्यात आलेल्या तनसुख झांबड यांचे नाव अध्यक्ष ललित गांधी यांनी मराठवाडा विभागाच्या उपाध्यक्षपदासाठी प्रस्तावित केले. त्यास गव्हर्निंग काऊन्सिल सदस्यांनी एकत्रितपणे मान्यता दिली.

# सरकारने व्यापार उद्योग क्षेत्राला दुहेरी करामधून दिलासा द्यावा - ललित गांधी, अध्यक्ष

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते जाहीर सत्कार







**संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित व संगमनेर व्यापारी असोसिएशनतर्फे आयोजित व्यापारी मेळाव्यास मार्गदर्शन करताना महसुल मंत्री बाळासाहेब थोरात, महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी**

संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित व संगमनेर व्यापारी असोसिएशनतर्फे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री  अँण्ड अँग्रिकल्चरचे नूतन अध्यक्ष ललित गांधी यांचा जाहीर सत्कार महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते संगमनेर व्यापारी असोसिएशनच्या हॉलमध्ये करण्यात आला. संगमनेर येथील महाराष्ट्र चेंबरचे नूतन कार्यकारिणी सदस्य निलेश चव्हाण व प्रकाश कलंत्री यांचाही सत्कार करण्यात आला तसेच याप्रसंगी व्यापार उद्योगासमोरील आव्हान आणि नवीन संधी या विषयावर मार्गदर्शन संपन्न झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री ललित गांधी, उपाध्यक्ष श्री सुधाकर देशमुख, संगमनेर व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष ओंकारनाथ भंडारी, संगमनेर औद्योगिक वसाहतीचे चेअरमन भाऊसाहेब एरंडे, प्रांताधिकारी शशिकांत मंगरूळे उपस्थित होते.

व्यापार उद्योगासमोरील आव्हाने या विषयावर बोलताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी भविष्यात व्यापारी उद्योजकांनी एकसंघ होऊन काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले व्यापारी उद्योजकांसमोर अनेक मोठी आव्हाने आहेत. बदलत्या काळाप्रमाणे व्यापारी उद्योजकांनी बदलले पाहिजे आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारून मार्केटिंग केले पाहिजे.

औद्योगिक वसाहतीत उद्योगांना अनेक अडचणी



**नहाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांचा जाहीर सत्कार करताना महसुल मंत्री बाळासाहेब थोरात यावेळी व्यासपीठावर भाउसाहेब एरंडे, सुधाकर देशमुख, ओंकारनाथ भंडारी, शशिकांत मंगसुळे व अन्य मान्यवर.**

आहेत जागा मिळत नाहीत तसेच एमआयडीसी व ग्रामपंचायत दोघांकडून कर वसुली केली जाते दुहेरी कर वसुली हे चुकीचे आहे. अशा प्रकारची कर वसुली ही फक्त आपल्याच राज्यात होते. राज्यात इंडस्ट्रियल टाऊनशिप करण्याचा निर्णय झाला होता मात्र अद्याप त्याबाबत काही झाले नसल्याचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले. व्यापारी उद्योजकांना बँकांकडून कर्ज देताना स्टॅम्प ड्युटी आकारली जाते तेच कर्ज रिन्यू करताना स्टॅम्प ड्युटी पुन्हा घेतली जाते एकाच कामासाठी दोन वेळा स्टॅम्प ड्युटी घेतली जाते. दुहेरी कर वसुली व स्टॅम्प ड्युटीबाबत महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सहकार्य करून व्यापार उद्योग क्षेत्राला दिलासा द्यावा अशी मागणी अध्यक्ष ललित गांधी यांनी केली.

महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या व अध्यक्ष ललित गांधी यांच्या कार्यकाळात व्यापार-उद्योग क्षेत्रात चैतन्य निर्माण होऊन अतिशय चांगले कार्य महाराष्ट्र चेंबर मार्फत होईल असे सांगितले. महाराष्ट्र चेंबरने राज्यात विविध ठिकाणी मार्गदर्शन कार्यशाळा, सेमिनार आयोजित करावे असे महसूलमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले. सरकारतर्फे व्यापार उद्योग क्षेत्राला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन श्री. थोरात यांनी दिले.

संगमनेर व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष ओंकारनाथ भंडारी, संगमनेर औद्योगिक वसाहतीचे चेअरमन भाऊसाहेब एरंडे यांनी मनोगत व्यक्त केले.

संगमनेर येथील २५ व्यापारी उद्योजकांनी याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे सभासदत्व घेतले या नूतन सभासदांना महसूल मंत्री श्री बाळासाहेब थोरात व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास महाराष्ट्र चेंबर चे कार्यकारणी सदस्य संजय राठी रतन पडवळ कैलास पाटील व संगमनेर येथील व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारत आणि थायलंड मध्ये व्दिपक्षीय व्यापारवृद्धीसाठी अगणित संधी - ललित गांधी

## टॉप थाय ब्रॅण्ड - ट्रेड फेअर - २०२२ ला सुरवात





**टॉप थाय ब्रॅण्ड - ट्रेड फेअर - २०२२ चे उद्घाटनाप्रसंगी दीपप्रज्वलन करतांना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत रॉयल थाई कॉन्सुल जनरल श्री. डोनाविट पूलसावत, इंडो थाई चेंबर ऑफ एमएसएमइचे अध्यक्ष रोहित मेहता, चेतन नरके. दुसऱ्या फोटोमध्ये रॉयल थाई कॉन्सुल जनरल डोनाविट पूलसावत यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी.**

**पुणे** : डिपार्टमेंट ऑफ इंटरनॅशनल ट्रेड प्रमोशन, थायलंड, आणि मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स रॉयल थाय गव्हर्नमेंट यांच्या वतीने आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या सहकार्याने हडपसर पुणे येथील लक्ष्मी लॉन येथे दिनांक २५ ते २७ मार्च २०२२ अशा तीन दिवसीय 'टॉप थाय ब्रॅण्ड - ट्रेड फेअर - २०२२' चे उद्घाटन 'महाराष्ट्र चेंबर'चे अध्यक्ष ललित गांधी व रॉयल थाई कॉन्सुल जनरल श्री. डोनाविट पूलसावत यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी रॉयल थाई कॉन्सुल जनरल श्री. डोनाविट पूलसावत यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी इंडो थाई चेंबर ऑफ एमएसएमइचे अध्यक्ष श्री. रोहित मेहता, श्री. चेतन नरके, श्री. मनीष पाटील उपस्थित होते.

'महाराष्ट्र चेंबर'चे अध्यक्ष ललित गांधी यांनी भारत आणि थायलंड दरम्यान सध्यस्थितीत १२.५ बिलिअन डॉलर चा व्यवसाय होत असून, भविष्यात यामध्ये मोठी वाढ होण्याचे संकेत दिसत असल्याचे सांगितले. जागतिक पातळीवरील बदलत्या राजकीय घडामोडीचा फायदा थायलंड आणि भारताच्या एकत्रित आर्थिक विकासासाठी आणि भारत आणि थायलंड मध्ये व्दिपक्षीय व्यापारवृद्धीसाठी अगणित संधी निर्माण करणारा असून हा ट्रेड शो स्थानिक उद्योग आणि उद्योजकांना चालना देऊन नवी रोजगार निर्मिती करणारा होईल असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

रॉयल थाई कॉन्सुल जनरल श्री. डोनाविट पूलसावत यांनी उभय देशातील व्यापारी संबंध वृद्धिंगत करणे, दोन्ही देशातील उद्योजकांमध्ये व्यापारी करार करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून यामध्ये दोन्ही देशामधील उद्योजकांना उद्योग संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. यातून आर्थिक, बौद्धिक गुंतवणुकीसह रोजगार आणि उद्योगाच्या नवनवीन संधी निर्माण होणार असल्याचे रॉयल थाई कॉन्सुल जनरल श्री. डोनाविट पूलसावत यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबरच्या इंटरनॅशनल रिलेशन समितीचे को चेअरमन श्री. चेतन नरके यांनी राज्यातील व्यापार उद्योग वाढावा, जागतिक स्तरावर महाराष्ट्रातील व्यापार उद्योगाला स्थान मिळावे, आयात निर्यात वाढावी यासाठी महाराष्ट्र चेंबरच्या इंटरनॅशनल रिलेशन समितीच्या माध्यमातून सुरु असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. हेल्थ ॲण्ड ब्युटी, फूड ॲण्ड बेवरेज, फर्निचर आणि फॅशन या चार श्रेणीतील थायलंड मधील ३४ उद्योजक/उत्पादक/ संस्था या मध्ये सहभागी झाले आहेत. या ट्रेड शोसाठी थायलंड सरकारचे अधिकारी आणि थायलंड मधील उद्योजक उपस्थित होते.




# आयमा इंडेक्सच्या माध्यमातून उद्योगांचा विकास होईल - ललित गांधी

## आयमातर्फे सन्मानचिन्ह देऊन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा सन्मान

'अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन' तर्फे डोंगरे वस्तीगृह नाशिक येथे औद्योगिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ऍग्रिकल्चर' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रदर्शनाला भेट दिली. याप्रसंगी प्रदर्शनाचे चेअरमन धनंजय बेळे यांनी सन्मानचिन्ह देऊन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचे स्वागत व सन्मान केला.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी उत्तर महाराष्ट्राचा विकास करण्यात महाराष्ट्र चेंबरने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याचबरोबर स्थानिक व्यापारी व औद्योगिक संघटनांना बरोबर घेऊन उत्तर महाराष्ट्राचा विकास करण्यात येत आहे. आयमा इंडेक्स या प्रदर्शनाच्या माध्यमातून निश्चितच उद्योगांचा विकास साधला जाईल त्यांना चांगली बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या प्रदर्शनाच्या माध्यमातून झाला ही कौतुकाची बाब असल्याचे ललित गांधी यांनी सांगितले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख एम एसएसएमइ समितीचे चेअरमन आशिष नहार, कार्यकारणी सदस्य रवींद्र झोपे, राजेंद्र कोठावदे, मनीष रावल, कैलास पाटील , विजय बेदमुथा, उमेश वानखेडे, आयमाचे ललित बूब, राजेंद्र अहिरे, किरण खाबिया उपस्थित होते.

◆◆◆





## संगमनेर मर्चंट बँकेला भेट...

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी संगमनेर मर्चंट बँकेला भेट दिली व चेअरमन आणि संचालक मंडळाशी स्थानिक व्यापार उद्योगाबाबत चर्चा केली. याप्रसंगी संगमनेर मर्चंट बँकेतर्फे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार उद्योगपती राजेश मालपाणी यांनी केला. यावेळी बँकचे चेअरमन दिलीप पारख, संचालक मंडळ व चेंबरचे पदाधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या चांगल्या संधी

## पालकमंत्री सतेज पाटील : वायब्रंट महाएक्स्पोच्या माहिती पत्रिकेचे अनावरण








**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे होणाऱ्या प्रदर्शनाच्या माहीती पत्रिकेचे अनावरण प्रसंगी पालकमंत्री सतेज पाटील यांनी महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ललित गांधी यांचा सत्कार केला. दुसऱ्या छायाचित्रात मार्गदर्शन करताना पालकमंत्री सतेज पाटील, ललित गांधी.**

**कोल्हापूर** : कोकण, गोव्याशी जोडणारे रस्ते चांगले होत आहेत. सातारा-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरण होणार आहे. विमानतळ विस्तारीकरणाचे कामही गतीने होत आहे. यामुळे दळणवळण आणि हवाई प्रवासही सुकर होणार असल्याने येत्या तीन वर्षात पुण्यानंतर कोल्हापूरच विकासात टॉपला असेल, त्यामुळे गुंतवणुकीच्या चांगल्या संधी आहेत असे पालकमंत्री सतेज पाटील यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी बोलताना औद्योगिक उत्पादनाचे हे प्रदर्शन असून उद्योजकांना प्रदर्शनाच्या माध्यमातुन एक चांगली संधी मिळेल. देशभरातील नामवंत कंपन्यांचे स्टॉलचा समावेश या प्रदर्शनामध्ये असून दोन वर्षाच्या कोरोनाच्या कालावधीनंतर हे विकासाला चालना देणारे नव्या पध्दतीचे प्रदर्शन भरविले असुन, प्रदर्शनाच्या निमित्ताने माहीती तंत्रज्ञान याची माहीती होणार आहे. रोबाटीक टेक्नॉलॉजीचा यामध्ये समावेश आहे याचा उपयोग उद्योग क्षेत्रात नव्या पीढीला करता येणार आहे.

यावेळी कोल्हापूर चेंबरचे संजय शेटे, मॅकचे अध्यक्ष संजय पेंडसे, गोशिमाचे अध्यक्ष मोहन पंडीतराव, स्मॅकचे अध्यक्ष दिपक पाटील, क्रीडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, सत्यजित भोसले आदि उपस्थित होते. हरीभाई पटेल यांनी आभार मानले.




**कोल्हापूर रेसिडेन्सी क्लब येथे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे होणाऱ्या प्रदर्शनाच्या माहीती पत्रिकेचे अनावरण झाले यावेळी पालकमंत्री सतेज पाटील, अध्यक्ष ललित गांधी, विद्यानंद बेडेकर, सुमित कदम, संजय शेटे आदी उपस्थित होते.**

कौशल्यम् बलम्

MACCIA 100 1927-2027

Apex Chamber of the State

MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

MSSDS MAHARASHTRA STATE SKILL DEVELOPMENT SOCIETY

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रीकल्चर
## कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता विभाग, महाराष्ट्र राज्य
## महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी
## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# Maharashtra Skill Summit - 2022

# राज्यस्तरीय कौशल विकास परिषद

**दिनांक ०९ एप्रिल २०२२ रोजी दुपारी ०२:०० ते ०५:०० वा**
**महाकवी कालीदास सभागृह, शालिमार, नाशिक.**


## परिषदेचे मुख्य विषय

- कौशल विकास क्षेत्रासाठीचे राज्य व केंद्र सरकारचे धोरण
- नवयुवकांच्या उद्योजकतेसाठी कौशल विकास चे महत्व
- उद्योग व शिक्षण संस्था यांचा समन्वय
- कौशल विकासातुन रोजगार निर्मिती
- कौशल विकास प्रशिक्षण संस्थांना प्रोत्साहन
- कौशल विकास प्रशिक्षण संस्थांच्या प्रलंबित समस्यांचे समाधान


## प्रमुख मार्गदर्शक



नाम. श्री. नरहरी झिरवाळ
उपाध्यक्ष,
विधानसभा



नाम. श्री. राजेश टोपे
आरोग्य व कौशल विकास मंत्री,
महाराष्ट्र राज्य



नाम. श्री. शंभुराज देसाई
गृह, कौशल विकास राज्य मंत्री,
महाराष्ट्र राज्य



श्री. दिपेंद्रसिंह कुशवाह (IAS)
चिफ एक्झीक्युटीव ऑफीसर
MSSDS

• सहयोगी संस्था •

कौशल्यज्ञानदातृहिताय
VTP ASSOCIATION

• प्रायोजक •

BEDMUTHA GROUP

SKD GROUP

SINCE 1989
DEEPAK BUILDERS & DEVELOPERS

**परिषदेत सहभागी होण्यासाठी sagar@maccia.org.in या ईमेल वर नोंदणी करा.**

**Date of Publish : 06th April 2022** **Page No. 1 to 48**
WPP License No.: NMR/Tech/WPP-21/Nashik/2022-23 License to Post without prepayment. Posted on 06th April 2022 at Nashik
Head office Regd. No: NSK/RNP-82/2021-2023. Registered with Regr. of News Papers for India under Delhi Regd. No. 20803/71

# 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर' च्या वतीने पश्चिम महाराष्ट्रातील दुसरे भव्य औद्योगिक प्रदर्शन आयोजित

MAKE IN INDIA

VIBRANT MAHAEXPO 2022

WESTERN MAHARASHTRA'S
LEADING MACHINERY
AND INDUSTRIAL EXHIBITION

15 16 17 18 April 2022

Shahupuri Gymkhana Ground,
Kolhapur





Organized by
MACCIA 100 1927-2027
Apex Chamber of the State
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRIES & AGRICULTURE

Co Organised by :
महाराष्ट्र शासन
KCCI KOLHAPUR CHAMBER OF COMMERCE & INDUSTRIES
MIDC



CONTACT : 83085 30800 | 83085 20900 | 84080 50800

Supported By
SMAK
गोशिमा
KEA
MAKH
WESMACH
डेस्टीनेशन कोल्हापूर

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक विनी दत्ता यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स, सातपूर, नाशिक-७ येथे छापुन २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक-१ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M.G. Road, Nashik-1